पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

14 वर्ष वर्धापन दिन

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक ३४५ ■ बुधवार, दि. २४ जून २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# राज्यासह विदर्भात पावसाची हजेरी !

## अनुकूल हवामानामुळे मान्सूनची प्रगती...

प्रतिनिधी २४ जून

**पुणे :** मान्सूनने सलग दुसऱ्या दिवशी प्रगती करत मंगळवारी मुंबईसह संपूर्ण कोकण विभाग व्यापला. दुसरीकडे मराठवाड्याचा बहुतांश भाग व्यापत मोसमी पावसाने विदर्भातही प्रवेश केला. अकोला, यवतमाळ, वाशिम, बुलडाणा, अमरावती जिल्ह्यात दरमदार हजेरी लावली आहे. या पावसाने शेतकरी सुखावला असून, आणखी पाऊस पडल्यास पेरण्यांना प्रारंभ होणार आहे. सध्या हवामान अनुकूल असल्याने पुढील दोन दिवसांत मान्सूनची आणखी प्रगती अपेक्षित असून, येत्या आठवड्यात कोकणात सर्वदूर पावसाचा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागाने (आयएमडी) वर्तविला आहे.

अरबी समुद्रावर मोसमी वाऱ्यांना जोर आल्यामुळे मान्सूनने मंगळवारी अलिबागच्या पुढे वाटचाल करत मुंबईसह कोकणाचा उर्वरित भाग व्यापला. दुसरीकडे, मध्य महाराष्ट्रातील नाशिक, मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर आणि विदर्भातील वर्ध्यापर्यंत मान्सूनने मजल मारली. उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भातही अनेक ठिकाणी दुपारनंतर विजांसह पावसाच्या जोरदार सरी कोसळल्या. 'आयएमडी'च्या अंदाजानुसार, कोकण आणि गोव्यात २७ ते २९ जूनदरम्यान; तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात २४ ते २६ जूनदरम्यान काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे.

दरम्यान, पावसाने आणखी दमदार हजेरी लावण्याची अपेक्षा व्यक्त केली जात असली, तरी आज सकाळपासून सुरू असलेल्या पावसाने शेतकरी सुखावल्याचे दिसून येते.



### कोयना पाणलोट क्षेत्रात पावसाची संततधार

सकाळपासून कोयना पाणलोट क्षेत्रासह तालुक्यात पावसाने संततधार चालू केली आहे. सकाळी आठपासून पावसाने सुरुवात केली. सायंकाळनंतर पावसाने दमदार हजेरी लावली. पाणलोट क्षेत्रातील कोयना, नवजा व महाबळेश्वर या ठिकाणी सरासरी ५० टक्केपेक्षा जास्त पावसाची नोंद झाली आहे. पाणलोट क्षेत्रातील कोयना ६१, नवजा ५२, तर महाबळेश्वर येथे ४३ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. एक जून ते आजअखेर एकूण कोयना ९६, नवजा १३९, महाबळेश्वर ८० मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे.

### विदर्भातील बळीराजा सुखावला

मंगळवारी दुपारपासून अकोल्यासह यवतमाळ, बुलडाणा, वाशिम, अमरावती जिल्ह्यात पावसाने जोरदार हजेरी लावल्यामुळे बळीराजा सुखावला आहे. आज सकाळपासूनही काही भागात व राज्यात पावसाने हजेरी लावल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण दिसून आले आहे. वळवाच्या पावसाने हुलकावणी दिल्याने गेली महिनाभर प्रतीक्षेत असणाऱ्या शेतकऱ्यांना रिमझिम पडणाऱ्या पावसामुळे दिलासा मिळाला. शेतकऱ्यांनी पेरणीची तयारी पूर्ण केली असून, दमदार पावसाची वाट आता शेतकरी पाहात आहेत.

## उद्धवसेनेला आजच दिल्लीत बोलावले!

**नवी दिल्ली :** 'ऑपरेशन टायगर' अंतर्गत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिंदेसेनेने ठाकरेंकडील ६ खासदार गळाला लावले. परंतु अद्याप लोकसभा अध्यक्षांकडून या फुटीर गटाच्या विलीनीकरणाला मान्यता देणारी कुठलीही माहिती प्रसारित करण्यात आली नाही. त्यात आज दिल्लीत लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी उद्धवसेनेच्या नेत्यांना भेटीसाठी बोलावले आहे. संध्याकाळी ५ वाजता उद्धवसेनेचे गटनेते लोकसभा अध्यक्षांची भेट घेणार आहेत.



## आरआरसी समूहाकडून श्रींच्या पालखीचे स्वागत!

दोन दिवसांपासून अकोल्यात श्रींच्या पालखीचे आगमन झाले असून, संपूर्ण शहरच श्रींच्या भक्तीमध्ये तल्लीन झाले आहे. ठिकठिकाणी श्रींच्या पालखीचे स्वागत करण्यात येत आहे. मंगळवारी दुपारी श्रींची पालखी ७०० वारकऱ्यांसह गांधी रोडवरून जात असताना आरआरसी समूहाच्यावतीने या पालखीचे व्यवस्थापक प्रसाद पिसोळकर यांनी पूजन केले. यावेळी आरआरसी समूहाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## समृद्धी महामार्गावर भीषण अपघात ; डॉक्टर दाम्पत्याचा करुण अंत

प्रतिनिधी २४ जून

**बुलढाणा :** भरधाव कार समोरील ट्रकला मागून जोरात धडकल्याने झालेल्या भीषण अपघातात छत्रपती संभाजीनगर येथील डॉक्टर दाम्पत्याचा मृत्यू झाला तर मुलामुलीसह चालक गंभीर जखमी झाला. समृद्धी महामार्गाच्या मुंबई कॉरिडोरवर चॅनल क्रमांक ३२६.५ वर दुसरबीड-किनगाव राजादरम्यान मंगळवारी सकाळी सहा वाजताच्या सुमारास ही दुर्घटना घडली.

डॉ. सय्यद असिफ सय्यद उमर (वय ५२) व डॉ. गुलसिताबी सय्यद असिफ (वय ४५) यांचा या अपघातात जागीच मृत्यू झाला. तसेच मुलगी सबा सय्यद असिफ (वय १८), मुलगा सय्यद अजबमाज सय्यद असिफ (वय २५) व चालक शेख साजिद शेख फरीद हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर छत्रपती संभाजीनगर येथे उपचार सुरू आहेत. डॉक्टर दाम्पत्य छत्रपती संभाजीनगर येथील रहिवासी होते. सिंदखेड राजा तालुक्यातील किनगाव राजा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील मुंबई कॉरिडोरवरील चॅनल क्रमांक ३२६.५ येथून एमएच २०-एचएन ६७६८ क्रमांकाची फॉर्च्यूनर कार मुंबईच्या दिशेने जात होती. कारचा वेग अधिक होता. चालकाचे नियंत्रण सुटल्याने ही कार समोरील एनएल ०१ एडी ४९८१ क्रमांकाच्या मालवाहू ट्रकला पाठीमागून जोरात धडकली.

## वीज कोसळून तिघांचा मृत्यू; दोघे जखमी

प्रतिनिधी २४ जून

**यवतमाळ :** जिल्ह्यात मंगळवारी झालेल्या जोरदार पावसासह विजांच्या कडकडाटामुळे दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये तिघांचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर दोघेजण जखमी झाले आहेत. या घटनांमुळे कळंब व उमरखेड तालुक्यांत हळहळ व्यक्त होत आहे. दरम्यान, हवामान विभागाने यवतमाळ जिल्ह्यासाठी यलो अलर्ट जारी केला असून पुढील काही तासांत मेघगर्जनेसह पावसाचा इशारा दिला आहे.

कळंब तालुक्यातील उमरी येथे दुपारी सुमारे चार वाजताच्या सुमारास शेतात काम सुरू असताना अचानक वीज कोसळली. या दुर्घटनेत भीमराव रामभाऊ लाटकर (५५) व निखिल वाल्मिक भोयर (३२) यांचा जागीच मृत्यू झाला. तर साहील भीमराव लाटकर (२०) हा गंभीर जखमी झाला असून त्याला उपचारासाठी यवतमाळ येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात आले. दुसरी घटना उमरखेड तालुक्यातील कुरळी भोजनगर तांडा येथे घडली. येथे वीज पडल्याने महेश गणेश आडे (२५) यांचा मृत्यू झाला. त्यांच्या सोबत असलेले काळू कनीराम पवार हे जखमी झाले असून त्यांच्यावर पुसद येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## २७ जूनला उद्धव ठाकरे यांची यवतमाळात जाहीर सभा

**यवतमाळ :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय देशमुख यांनी नुकताच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिंदे गटात प्रवेश केल्यानंतर यवतमाळ जिल्ह्यातील राजकीय घडामोडींना वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाने संघटना बळकट करण्यासाठी कंबर कसली असून, पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची २७ जून रोजी यवतमाळ येथे जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे.

J.K. FURNISHING
Sleepwell Gallery
Your Own Mattress Store
• Foam Mattress • Pillow, Cushions
• Coir Mattress • Sofa Fabric
Bhaskar Jawarkar
9146099196 / 9422190280
Aditya Jawarkar
9689509334
Near Best Cinema, Jaistambh Chowk, Amravati. Tel. 0721-2675898



# वरुर जऊळका येथे हजारो भाविकांच्या उपस्थितीत पालखीचे प्रस्थान

प्रतिनिधी २४ जून

**अकोट :** संत नगरी वरुर जऊळका येथील योग योगेश्वर संस्थान संत गजानन महाराज मंदिर ते महाक्षेत्र पंढरपूर पायदल दिंडी सोहळ्याचे आयोजन केले असून २० ऑगस्ट रोजी दिंडी सोहळा पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ झाला




यामध्ये सकाळी ट्रेनच्या मूर्तीचा अभिषेक व लगेच ह भ प मोहन महाराज मेतकर यांचे कीर्तन पार पडले यावेळी वासुदेव म. खोले गुरुजी, रामदास म.जवंजाळ, अवधूत म. पारस्कर, बाबुळकर महाराज, संभाजी म.नवले, हरिदास म. पिंपरे ,रवींद्र म. केंद्रे, प्रकाश म.पांडे, गोपाल म. नारे,गोपाल म. दोळ, गजानन म. एरोकार,सोमेश म. घाटोळ, प्रज्वल म. काळे ,कार्तिक म. रोकडे , विक्रम म. शेटे ,ओम म ,कार्तिक म. झांबरे

विजय झांबरे, अमोल कुलट, निखील अमेय गावंडे,मनोहर पाटिल,सिरस्कर गुरुजी,मोहोकार,मनोहर लोडम ,गोपाल अहिर, सुनील राजगुरु,विनोद नायसे, डॉ अग्रवाल ,कृष्णा अमानतकर ,परराम महाराज भक्त परीवार, माधव बकाल, ज्ञानेश्वर साबळे, दाते सर, विठ्ठला तूरखडे, बबन खराड, मुरलीधर शेंद्रे, भानुदास पाटील, हिंगणकर सर,

श्रींच्या पालखीच्या दर्शनानंतर पंचक्रोशीतील सर्व भक्त मंडळी हजारोंच्या संख्येने उपस्थित होते यांना महाप्रसादाची व्यवस्था विदर्भ गाथापरान समितीच्या वतीने करण्यात आली दिंडी मार्गस्थ झाल्यानंतर लोतखेड फाट्यावर कुलदीप बसू यांनी दिंडीचे भव्य स्वागत केले दीनोडा येथे गणेश कराड, निलेश वाकोडे, संतोष म. घुगे यांच्या वतीने पालखीचे पूजन व वारकऱ्यांची चहा नाश्ता व्यवस्था करण्यात आले रात्री कावसा गावामध्ये अविनाश नरोकार यांच्या इथे ह भ प हरिदास म. पिंपरे यांची कीर्तन सेवा पार पडली आणि वारकऱ्यांची भोजन निवास व्यवस्था करण्यात आली वरील सर्व कार्यक्रम योगेश्वर संस्थान विश्वस्त मंडळ गणेश महाराज शेटे ,भास्कर म. बहाळ, रतन वानखडे, श्रीकृष्ण वरहीकर,विनायक शेटे ,संदीप रामेकर यांच्या मार्गदर्शनात व पंचक्रोशीतील भक्तांच्या सहकार्याने पार पडला.

# गुरुकुल नगरीतील डांबरी रस्ता उखडला नागरिकांना त्रास

प्रतिनिधी २४ जून

**अकोला :** मलकापुर येथील प्रभाग क्र १४ अतर्गत येनाऱ्या गुरुकुल नगरी येथील गुरुकुल कमान ते संतोष नगर पर्यंत २० वर्षापूवी बांधलेला डांबरी रस्ता उखडाला असुन मोठे खड्डे पडले आहेत. परीसरातील नागरिकांना ये जा करण्यासाठी हा मुख्य रस्ता आहे.

२० वर्षा पूर्वी रहदारी कमी होती. आता रहदारी वाढली आहे. अनेक दवाखाने मोठी प्रतिष्टाने आहेत तसेच गुरुकुल नगरी परिसरात संत वासुदेव महाराज यांची पालखी मुक्कामी असते. परिसरातील नागरीकांना येजा करतांना कसरत करावी लागत आहे. परिसरातील वाढलेली रहदारी बघता रस्ता अरुंद आहे त्यामुळे परिसरातील नागराकांनी अनेकदा संबधी त प्रशासन व महानगर पालीका कडे तक्रारी केल्या मात्र अद्याप पर्यंत कायम स्वरुपी दुरुस्ती करण्यात आलेली नाही पावसाळयात परिस्थीती आनखी गंभीर होण्याची शक्यता लक्षात घेता. संबधीत प्रशासन महानगरपालीका प्रभाग१४ येथील नगर सेवक पराग गवई. शे. शमसु. उज्वला पातोडे. जयश्री बहादुरकर यांनी तातडीने रस्ता दुरुस्तीचे कामे हाती घ्यावीत व नागरीकांना होण्याऱ्या त्रासातून सुटका करावी अशी मागणी परीसरातील रहीवासी गजानन वाघ व नागरीक करतआहेत.

# गजानन नागरी सह पत संस्थेच्या ठेवीदारांचे प्रशासनाला साकडे

प्रतिनिधी २४ जून

**अकोला :** मागील तीन ते चार वर्षापासून गजानन नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष, व्यवस्थापक आणि सर्व संचालकांनी ठेवीदार, भागधारक तसेच सर्व खातेदारांना अंधारात ठेवून व्यक्तीगत आर्थिक लाभासाठी गैरव्यवहार करुन २४ कोटी रूपयांचा घोटाळा केल्याचे उघडकीस आले आहे. आपल्या जवळच्या लोकांना व नातेवाईकांना सर्व नियम धाब्यावर बसवून लाखो रूपयांचे कर्ज दिले, फसवणूक करून चल अचल संपत्ति जमा केली. आपल्या कष्टाचा पैसा मुला-मुलींचे शिक्षण, लग्न तसेच आपत्कालीन परिस्थिती साठी गुंतवणूक करणाऱ्या ठेवीदारांना यांनी रस्त्यावर आणले. त्रस्त ठेवीदारांनी आपले पैसे परत मिळावे यासाठी तालुका निबंधक, जिल्हा उपनिबंधक अकोला, सहनिबंधक सहकारी संस्था अमरावती, सहकार आयुक्त आणि निबंधक सहकारी संस्था पुणे, राज्याचे सहकार मंत्री, प्रधान सचिव (सहकार व पणन) पोलीस अधीक्षक अकोला तसेच जिल्हाचे पालकमंत्री, खासदार, आमदार यांना निवेदन दिले आहे. संस्थेचे अध्यक्ष आणि व्यवस्थापक यांना अटक करण्यात आली आहे. मा न्यायालयाचे आदेश असूनही संचालकांवर मात्र कुठलीही करण्यात आलेली नाही. तालुका उपनिबंधक, जिल्हा उपनिबंधक तसेच पोलीस? खात्याच्या तपासात अटक करण्यात आलेले पत संस्थेचे अध्यक्ष व व्यवस्थापक यांनी केलेल्या पैश्याच्या अफरातफरी संबंधी कुठलीही माहीती? अद्याप पर्यंत उघड झालेली नाही. जि उप निबंधक कार्यालयाला पतसंस्थेच्या कर्जदारां कडून सक्तीने कर्ज वसूल करण्याचे अधिकार आहेत. त्यांनी वसूली मोहीम राबवावी.? दोषी पदाधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी. पतसंस्थेची तसेच त्यांची संपत्ती जप्त करावी. प्रकरण लवकर निकाली काढून ठेवीदारांचे पैसे मिळवून द्यावे. अशी विनंती गजानन नागरी पतसंस्थेच्या समस्त ठेवीदारांनी प्रशासनाला केली आहे.

# मनरेगा कायदा बदलू नका : नयन गायकवाड

प्रतिनिधी २४ जून

**अकोला :** शेतमजुरांच्या मागण्या बाबत भारतीय कम्युनिस्ट पक्ष व महाराष्ट्र राज्य लाल बावटा शेतमजूर युनियन सलग्न भारतीय खेत मजदूर युनियन कॉम्रेड नयन गायकवाड यांच्या नेतृत्वात १५ ते २२ जून दरम्यान मनरेगा बचाव जनजागरण अभियान राबवित आहे. २३ जून जिल्हाधिकारी कार्यालयावर महाधरणे, निवेदन दिले. या कायद्यात बदल करू नका अशी मागणी केली.



अन्न,वस्त्र,निवारा,आरोग्य शिक्षण ह्या प्राथमिक गरजा पूर्ण करणे अत्यंत कठीण झाले आहे. महिला मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या कर्जात पूर्णपणे बुडालेल्या आहेत. सरकारी कर्ज मिळत नाही. सर्वाधिक विस्थापित शेतमजूर होत आहेत. घरकुलाला मिळणारी रक्कम अत्यंत तुटपुंजी आहे. घरकुल बांधल्यानंतर पुन्हा कर्जाचा डोंगर वाढत आहे. आदी विषयांकडे लक्ष वेधले.

नायब तहसीलदार रोहयो यांना निवेदन देताना कॉम्रेड नयन गायकवाड, ज्योती ताथोड, माधुरी परणाटे, चित्रा दांडगे, शीला मोरे, वंदना राखोंडे, रुख्मिणी डबेराव, रश्मी गजभिये, सुजाता मेश्राम, कविता इंगळे, कोमल वासनिक, पूजा बोरकर, प्राची सूर्यवंशी, कविता सिंगमवर, मनीषा बनसोड, रक्षा कथाने, वनमाला वासत्कर, अश्विनी सूर्यवंशी, सोनाली डोंगरे, पूर्णिमा पाटील, शबाना खलीवले, नीता काठाने उपस्थित होते.

# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळ अकोला शाखेचा सर्वशाखीय महाराष्ट्रीय विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा

प्रतिनिधी २४ जून

**अकोला :** देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळ अकोला शाखेचा सर्वशाखीय महाराष्ट्रीय विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा १९ जुलै २०२६ रोजी आयोजित केला आहे .यात इयत्ता चवथी प्रथम श्रेणी, ऑलिम्पिकयाड स्पर्धा परीक्षा, इयत्ता ५ वी व ८ वी शिष्यवृत्ती , १० वी व १२ वी तिन्ही शाखांमध्ये ७५३ गुण तसेच पदवी/पदवीधर व कला /क्रीडा क्षेत्रात विशेष प्राविण्य विद्यार्थ्यांना गौरविण्यात येईल. त्यासाठी खालील पत्त्यावर आपली गुणपत्रिकेची झेरॉक्स त्यामागे विद्यार्थ्याचे पूर्ण नाव /पत्ता/फोन नंबर व आपली शाखा लिहावी. मंजुषा घोटीकर ,जठारपेठ, मालिवाल गॅस गोडावून समोर ,मयुरेशवर अपार्टमेंट ९४०५९०२०४०, प्रदीप वांगीकर, जठारपेठ ,गोविंद अपार्टमेंट, दिवेकर चौक ९८२२२३८२२४, दिनेश देशपांडे ,'वेदांग' प्रतिष्ठान रामदासपेठ ९४२१७५४४९५, मृणाल कुळकर्णी 'लस्सी' कॉर्नर एकविरा मैदान समोर गौरक्षण रोड,८४०८०९८१११, संजय देशमुख, गोरक्षण रोड बिकानेर हलवाई समोर, ९९२२४५३९२२, संजय जोशी ,माधव नगर गोरक्षण रोड,९८२३८०२६७४ संजीव घड्याळजी,जुने शहर,गीतादेवी फार्मसी कॉलेज समोर ९३७२५०३४११, जयंत सरदेशपांडे ,सातव चौक पुष्पक अपार्टमेंट ,निलेश देव याचे ऑफिस ८५५२०७९९७७ यांच्याकडे विद्यार्थ्यांनी गुणपत्रिका ५ जुलै पर्यन्त आणून द्याव्या, असे आवाहन केले आहे.

# विद्यांचल द स्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात

प्रतिनिधी २४ जून

**अकोट :** स्थानिक विद्यांचल द स्कूल येथे रविवारी १२ वा आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. आयुष मंत्रालयाने यंदा दिलेल्या ’र्भ्दु दै पींत्ल ुंग्हु’ (निरोगी वृद्धत्वासाठी योग) या संकल्पनेनुसार विद्यार्थी, शिक्षक व कर्मचाऱ्यांनी सामूहिक योगाभ्यास करून निरोगी जीवनाचा संदेश दिला.



सकाळी ६.३० वाजता शाळेच्या मैदानावर शालेय प्रार्थनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. आचार्या वेदिका अस्वार यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कार्यक्रम प्रभारी राहुल ढोबळे व भाग्यश्री ढोबळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

या योग शिबिरात इयत्ता सहावी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसह सर्व शिक्षक, सहायक व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. योग शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली ताडासन, वृक्षासन, त्रिकोणासन, भुजंगासन तसेच विविध प्राणायामांचा सराव करण्यात आला. यावेळी योगाचे शारीरिक व मानसिक आरोग्यासाठीचे महत्त्वही उपस्थितांना समजावून सांगण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी नियमित योगाभ्यास करण्याचा तसेच कुटुंबातील ज्येष्ठ नागरिकांनाही योगाबाबत जागरूक करण्याचा संदेश देण्यात आला. आभार प्रदर्शन व राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# सैतवाळ संस्थेद्वारे सकल जैन समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान

प्रतिनिधी २४ जून

**अकोला :** अकोला :जिल्ह्यातील सकल जैन समाजातील दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा अखिल दिगंबर जैन सैतवाळ संस्था जिल्हा शाखेच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. अखिल दिगंबर जैन सैतवाळ संस्थेचे राष्ट्रीय महामंत्री नितीनभाऊ नखाते नागपूर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.



त्यांनी समाजासाठी असणाऱ्या विविध योजनांची माहिती देत नव्याने सुरू करण्यात आलेल्या वैद्यकीय सहाय्यता योजनेची माहिती दिली. विद्यार्थ्यांनी परिश्रम करून गरुड भरारी घ्यावी व परिवारासोबतच समाजाचे नाव उज्वल करावे असे आवाहन केले. यशस्वी विद्यार्थ्यांना उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. प्रमुख अतिथी म्हणून पश्चिम विदर्भ सचिव ॲड. संतोष जैन उमरखेड तसेच उमरखेडच्या नगराध्यक्षा सौ. तेजश्रीताई जैन यांनी विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या उत्कृष्ट यशाबद्दल विद्यार्थ्यांचे कौतुक केले. श्री १००८ पार्श्वनाथ संस्थान सैतवाळ दिगंबर जैन मंदिर जुने शहर अकोल्याचे अध्यक्ष रविंद्र उन्होने उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना जीवनामध्ये यश कसे मिळवायचे यासाठी करियर समुपदेशक चंद्रशेखर गुलवाडे अमरावती यांचे मार्गदर्शन लाभले. गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह व अभिनंदन पत्र देऊन पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अकोला जिल्हाध्यक्ष अनंत आगरकर यांनी केले. विद्यार्थ्यांचे शिक्षण आर्थिक अडचणीमुळे थांबणार नाही तर अशा विद्यार्थ्यांच्या पाठीमागे संस्था शिष्यवृत्तीचे पाठबळ देऊन ठाम पणे उभे राहील असे आश्वासन दिले. सुदर्शन टोपरे,अंजनगाव विभागीय उपाध्यक्ष यांचे कडून बारावी मधून प्रथम प्रथमेश सोनोने याला रोख रक्कम बक्षीस देण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. चैतालीताई साखरे यांनी केले तर उपस्थितांचे आभार संदीप उनवणे यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अशोक गडेकर, प्रदीप फुरसुले, विनोद उकळकर, डॉ. प्रकाश कहाते, फुलचंद बुरसे, आशिष राळेकर, अजित मनाटकर, संजय गडेकर, संदीप उनवणे, धनंजय संघई, दीपक वाडेकर, दीपक कस्तुरे,, शैलेश सोनोने, विशाल उन्होने, समीप इंदाने, महेश बोडखे, पवन वाडेवाले, चंद्रशेखरजी टोपरे, सौ.चैतालीताई साखरे.सौ.संध्याताई खडके,सौ.ममताताई जैन, सौ. अर्चनाताई नांदेडकर, सौ.सुनिता ताई उखळकर,सौ.प्रणिताताई उखळकर ,सौ.वैशालीताई उन्होने, सौ जयाताई जुननकर , सौ.रूपालीताई बोराळकर ताई,सौ.संध्याताई टोपरे तसेच संस्थेच्या महिला शाखेच्या सदस्य व जिनवाणी महिला मंडळ यांचे सहकार्य लाभले.

# कस्तुरीची 'वारी शिक्षणाची' येत्या २ जुलै रोजी...

प्रतिनिधी २४ जून

**अकोला :**' कस्तुरी' सामाजिक संस्था मात्र मेळघाट परिक्षेत्रातील अती दुर्गम भागातील जि.प. प्राथमिक शाळांतील गरीब व आदिवासी विद्यार्थ्यांसाठी 'वारी शिक्षणाची' उपक्रमाचे आयोजन करते.

कस्तुरीने २ जुलै रोजी अकोट अंजनगाव मार्गावरील अकोली जहांगीर पासून आडवळणावरील जनुना व वस्तापूर येथील जिप शाळांमध्ये शिकणाऱ्या २६० आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करणार आहे.

या अभिनव उपक्रमासाठी शहरातील सेवाभावी संस्था स्व. अथर्व अनिल मुळे मल्टीपर्पज फाउंडेशन , कृष्णार्पण प्रतिष्ठान,डॉ. कुसुमाकर घोरपडे, जगन्नाथ पटेल, सुभाष श्रावगी ,ओम प्रकाश खंडेलवाल, कमलकिशोर हरितवाल,अनिता इधोळ , सौ.संगीता धनंजय घोंगडे, यशवंत देशपांडे व अनेक मान्यवर देणगीदारांची साथ मिळत असून प्रकल्प यशस्वी होण्यासाठी संजय गायकवाड (प्रकल्प प्रमुख) , माजी आमदार वसंतराव खोटरे, संजय ठाकरे , अनिल पालवे , घनश्याम चांडक, राजेश्वर पेठकर , चेतना आनंदानी , सौ. अपर्णा काळे , दीपक झाडे , वसंतराव देशमुख , संजय बुटोले व सर्व कस्तुरी प्रेमी श्रम घेत आहेत... समाजबांधवांनी देखील या सेवाभावी उपक्रमात सहभागी होऊन , आदिवासी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवावे असे आवाहन कस्तूरीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. ॲड. किशोर बुटोले यांनी केले आहे.

# पक्क्या रस्त्या अभावी सिसा मासा येथील रहिवाशांचे हाल



प्रतिनिधी २४ जून

**अकोला :** अकोला तालुक्यातील बरीच गावे अद्याप पक्क्या रस्त्याने जोडलेली नाही. हे दुर्दैवी चित्र आहे. सिसा मासा बोंदरखेड येथील रहिवाशांचे देखील हाल होत आहे. काल रात्री पावसामुळे रस्त्यावर चिखल झाल्यामुळे आज सकाळी गावातील लोकांना वाहन चालवणे अशक्य झाले. काही जणांना वाहन हातात न्यावे लागले.

या भागातील रहिवाशांनी पक्क्या रस्त्याची मागणी केली. परंतु प्रशासन तसेच लोकप्रतिनिधी यांनी दुर्लक्ष केले. या रस्त्यावर मुरूम टाकून तात्पुरती व्यवस्था करण्यात यावी.

तसेच लोकांना पावसाळा भर होणारा त्रास वाचवावा अशी नागरिकांची मागणी आहे. सध्या निर्माण झालेल्या स्थितीबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

# माहिती अधिकाराच्या प्रथम अपिलात ग्रामसचिवाला १५ दिवसांचा 'अल्टिमेटम'!

प्रतिनिधी २४ जून

**आलेगाव** : पातुर तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत म्हणून ओळख असलेल्या आलेगाव ग्रामपंचायतीचा कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. माहिती अधिकार कायद्यांतर्गत मागितलेली घरकुल संबंधित माहिती अपूर्ण देऊन टाळाटाळ करणाऱ्या आलेगावच्या ग्रामसचिवाला (ग्रामसेवकाला) प्रथम अपील सुनावणीत चांगलाच दणका बसला असून, पुढील १५ दिवसांत संपूर्ण माहिती देण्याचे कडक आदेश देण्यात आले आहेत.

**काय आहे नेमके प्रकरण?**

मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, आलेगाव येथील रहिवासी अब्दुल जफर अब्दुल जहीर यांनी आलेगाव ग्रामपंचायती अंतर्गत घरकुल योजनेच्या सविस्तर माहितीसाठी माहिती अधिकार कायद्यान्वये अर्ज केला होता. ही माहिती मिळवण्यासाठी ग्रामपंचायत प्रशासनाने अर्जदाराकडून नियमानुसार संपूर्ण फी (पैसे) देखील भरून घेतली. मात्र, पैसे भरून घेतल्यानंतरही ग्रामपंचायतीने तक्रारदाराला अत्यंत तोकडी आणि अपूर्ण माहिती देऊन टाळाटाळ करण्याचा प्रयत्न केला.




**सुनावणीत माहिती लपवल्याचे स्पष्ट**

ग्रामपंचायतीकडून अपूर्ण माहिती मिळाल्याने अर्जदाराने याविरोधात सक्षम प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी (ँअ्द) यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले होते. या अपीलाची आज, दिनांक २३ रोजी रीतसर सुनावणी पार पडली. या सुनावणी दरम्यान दोन्ही बाजू ऐकल्यानंतर, ग्रामसचिवांनी संबंधित प्रकरणाची माहिती जाणीवपूर्वक अपूर्ण दिल्याचा आणि कायदेशीर फी घेऊनही माहिती पूर्ण न दिल्याचा प्रकार उघडकीस आला.

**गटविकास अधिकाऱ्यांचे कडक आदेश**

सुनावणी दरम्यान ग्रामपंचायतीच्या या बेजबाबदार कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. तसेच प्रथम अपील अधिकाऱ्यांनी संबंधित ग्रामसेवकाला कडक शब्दांत फटकारत, पुढील १५ दिवसांच्या आत तक्रारदाराला घरकुल संबंधित संपूर्ण आणि अचूक माहिती विनाविलंब उपलब्ध करून देण्याचे आदेश जारी केले आहेत.

**नागरिकांचे लक्ष लागून**

तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत असूनही माहिती अधिकारासारख्या महत्त्वाच्या कायद्याची पायमल्ली होत असल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे. आता या १५ दिवसांच्या 'अल्टिमेटम' नंतर तरी ग्रामपंचायत प्रशासन तक्रारदाराला घरकुल योजनेची संपूर्ण माहिती पुरवते की पुन्हा वेळकाढूपणा करते? याकडे आता तक्रारकर्त्यासह संपूर्ण आलेगाव परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.


## अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला ४४४००१

## जाहीर निविदा सुचना

अधिष्ठाता, शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, अकोला करीता आपात्कालीन वेळेस स्थानिकरित्या खरेदी करावयाच्या अत्यावश्यक व जीवरक्षक डायग्नोस्टिक किटस, रसायने व ग्लास वेअर साहित्या करीता पुरवठादारांकडून मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

निविदेची प्रक्रिया दोन लिफाफे पध्दतीने राहील, कोऱ्या निविदेचे मुल्य रुपये ३०००० (नापरतावा) रक्कम भरुन कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दि. २३/०६/२०२६ ते दि. ०२/०७/२०२६ पर्यंत सकाळी ११ ते ५ या वेळेत कार्यालयातून निविदा फॉर्म मिळू शकतील (सुटीचे दिवस वगळून).

**निविदा स्विकृतीची शेवटची दिनांक ०२/०७/२०२६ सायंकाळी ५ वाजेपर्यंत.**

**निविदा उघडण्याची दिनांक व वेळ ०३/०७/२०२६ सायंकाळी ५ वाजता**

**स्थळ : अधिष्ठाता, शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, अकोला यांच्या कक्षात**

पोस्टाने कोरी निविदा फॉर्म पाठविण्यात येणार नाही. निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार अधिष्ठाता, शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, अकोला यांना राहील. निविदा नमुन्यामध्ये पुरवठया संबंधीच्या अटी व शर्तीचा तपशिल नमुद केलेला आहे.

**अधिष्ठाता,**
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला.**

वि.मा.का./अम. / जहि./२७६/२०२६-२०२०

सिटी न्यूज अकोला
बुधवार दि. २४ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com





# अवतरलासी भूवर जढमुढ तारा या...



**अकोला :** *विठ्ठल माऊलीच्या दर्शनासाठी निघालेल्या शेगावच्या संत गजानन महाराज पालखी सोहळ्याचा दुसरा दिवसही भाविकांच्या उत्साह, श्रद्धा आणि भक्तिभावाने भारलेला होता. शहरातील प्रमुख परिसरात असलेल्या मांगीलाल बाजोरिया प्रांगण येथे पहाटे माऊलींच्या पालखीचे विधिवत पूजन व आरती मोठ्या भक्तिभावात झाली. बुधवारी सकाळी ६ वाजता टाळ-मृदंगाच्या गजरात, 'विठ्ठल विठ्ठल'च्या जयघोषात आणि भक्तिमय वातावरणात पालखी पुढील मार्गक्रमणासाठी मार्गस्थ झाली. जिल्हाधिकारी निवासस्थान, बिरसा मुंडा चौक, नेहरू पार्क, गौरक्षण रोड, इन्कम टॅक्स चौक मार्गे पालखी आदर्श विद्यालय (शाळा क्र. १६) येथे दुपारच्या विश्रांतीसाठी थांबली.*

*या ठिकाणी शहरातील विविध भागांतून तसेच परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून माऊलींचे दर्शन घेतले. संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला होता.*

त्यानंतर सायंकाळी पालखी सिंधी कॅम्प चौक, अशोक वाटिका, जिल्हा परिषद, जिल्हाधिकारी कार्यालय, सिटी कोतवाली, जयहिंद चौक, राजराजेश्वर मंदिर, किल्ला चौक, हरिहर पेठ व हरिहर मंदिर मार्गे पुढे जात रात्रीच्या मुक्कामासाठी जि.प. टाउन शाळेत पोहोचेल. पालखी मार्गावर पोलिसांचा चोख बंदोबस्त; एकनिष्ठेने बजावली सेवा

श्री संत गजानन महाराज पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या हजारो भाविकांच्या सुरक्षिततेसाठी पोलिस प्रशासनाने पालखी मार्गावर तसेच विश्रांती स्थळांवर चोख बंदोबस्त तैनात केला होता. श्रींच्या पालखी सोहळ्यात कोणतीही अनुचित घटना घडू नये आणि भाविकांना दर्शनाचा लाभ सुरळीतपणे घेता यावा यासाठी पोलिस यंत्रणा सतर्क होती. पालखी मार्गावर तसेच दर्शनस्थळी उसळलेल्या जनसागराच्या पार्श्वभूमीवर पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उन्हाची तमा न बाळगता आणि पावसातही एकनिष्ठेने आपली सेवा बजावली. श्रींच्या सेवेसाठी मिळालेली संधी हे आपले भाग्य असल्याची भावना मनात ठेवून पोलिस कर्मचाऱ्यांनी कर्तव्य पार पाडले.

शहरातून पालखीचे भ्रमण सुरू असताना वाहतुकीत कोणताही अडथळा निर्माण होऊ नये यासाठी वाहतूक व्यवस्थेचे प्रभावी नियोजन करण्यात आले होते. कोतवाली पोलिस ठाणे, जुने शहर पोलिस ठाणे, वाहतूक शाखा तसेच इतर विभागांतील अधिकारी व कर्मचारी विविध ठिकाणी तैनात होते.

**आरआरसी नेटवर्कचे थेट प्रक्षेपण**

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी आरआरसी नेटवर्कने थेट प्रक्षेपण करून घरबसल्या महाराजांचे दर्शन करविले. तसेच सोशल मीडियाच्या द्वारे लाईव्ह प्रसारणाने देश विदेशातील भाविकांनी सुद्धा दर्शनाचा लाभ घेऊन आरआरसीला धन्यवाद दिले.

भाविकांची सुरक्षा, शिस्तबद्ध दर्शन व्यवस्था आणि सुरळीत वाहतूक यासाठी विशेष खबरदारी घेण्यात आली. पालखी मार्गावरील स्वच्छता, शिस्त आणि सुरक्षा यांचे उत्तम नियोजन झाल्याने श्रींचा पालखी सोहळा शांततापूर्ण, सुरक्षित आणि भक्तिमय वातावरणात उत्साहात पार पडला.

पालखी मार्गाची झाडून स्वच्छता करून दिली सेवा

दरवर्षीप्रमाणे यंदाही हा श्री संत गजानन महाराज पालखी सोहळ्याचा पर्वा पर काही श्रीं भंक्तां कडून पालखी मार्ग स्वच्छ व निर्मळ ठेवण्यासाठी शहरातील मुख्य पालखी मार्गावर झाडू व खराट्यांच्या साहाय्याने स्वच्छता मोहीम राबवून आपली सेवा दिली. निर्मय बनो आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष प्रमोद धुमाळे, सुनील झाडोकार, दिनेश माईंडोकार यांच्यासह अनेक कार्यकर्ते व भाविकांनी या उपक्रमात सहभाग देत भक्तीबरोबरच सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले.



छाया : दीपक शर्मा











## दिव्यांगांच्या अडचणी दूर करण्याची नगरसेवक मनोज पाटील यांची मागणी

प्रतिनिधी २४ जून

**अकोला :** शहरात महामानवाचा ५० फूट उंच पुतळा उभारण्यात येत आहे, ही अत्यंत आनंदाची बाब आहे. यासाठी एक समिती गठित केली पाहिजे. तसेच महानगरपालिकेत दिव्यांग कक्ष पुन्हा सुरू करण्यात यावा, अशी मागणी शिवसेनेचे नगरसेवक मनोज पाटील यांनी सभागृहात केली.

मंगळवारी महानगरपालिकेची आमसभा झाली. सर्व नगरसेवकांनी आपापल्या प्रभागातील समस्या सभागृहासमोर मांडल्या. दरम्यान, शिवसेनेचे नगरसेवक मनोज पाटील यांनी दिव्यांगांच्या समस्या सभागृहासमोर मांडून एक आदर्श निर्माण केला. सर्वात आधी त्यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ५० फूट उंच पुतळ्याच्या उभारणीच्या प्रस्तावाचे स्वागत केले आणि यासाठी एक समिती स्थापन करण्याची सूचना केली.



**दिव्यांगांच्या भत्यात वाढ करण्याची मागणी**

तसेच, महानगरपालिकेत येणाऱ्या दिव्यांग बांधवांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो, हे लक्षात घेता मनपामध्ये पुन्हा एकदा दिव्यांग कक्ष सुरू करण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली. यासोबतच दिव्यांगांचा भत्ता १,२०० रुपयांवरून वाढवून १,५०० रुपये करावा आणि दिव्यांगांना रोजगारासाठी शहरात २८४ स्क्वेअर फूट जागा उपलब्ध करून द्यावी, अशीही मागणी त्यांनी लावून धरली. या दोन्ही मागण्या लवकरात लवकर पूर्ण कराव्यात, अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला. तसेच आपल्या प्रभागातील नालेसफाईच्या समस्येकडेही मनपा प्रशासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे, कारण यापूर्वी स्वच्छतेच्या अभावी प्रभागातील लोकांच्या घरात पाणी शिरले. त्याची पुनरावृत्ती होऊ नये याकडे मनोज पाटील यांनी सभागृहाचे लक्ष वेधले.

## महापालिकेच्या बेघर निवासस्थानात लाखोंचा घोळ?

**♦ काँग्रेस नगरसेवक आझाद खान यांचा आरोप**

प्रतिनिधी २४ जून

**अकोला :** दिनदयाळ अंत्योदय योजनेत बांधलेल्या राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानात बेघरांतील नागरिकांसाठी दिल्या जाणाऱ्या सेवा सुविधा, जेवण आणि त्याच बरोबर येथील देखभाल दुरुस्तीत मोठा घोटाळा झाल्याचा आरोप आज काँग्रेस नगरसेवक आझाद खान यांनी महासभेत केला.

काँग्रेस नगरसेवक आझाद खान यांनी बेघर नागरिकांना योग्य ते पोषण भत्ता मिळावा. त्यांच्या हक्कावर कोणी गदा आणू नये साठीचा हा लढा आहे. गरिबांच्या ताटातील कोणी अन्न ओढून घेऊ नये यासाठी आझाद खान यांनी अतिशय तळमळीने हा मुद्दा महासभेत उपस्थित केला. इतकेच नाही तर त्यांनी स्वतः या बेघर निवासस्थानाला भेट देत सर्व



नगरसेवकांनी या ठिकाणी जाण्याची गरज व्यक्त केली. ज्यांना कोणी नाही त्यांच्यासाठीची ही सोय चांगली आहे. पण, त्यात होत असलेल्या भ्रष्टाचार हा लाखो रुपयांमध्ये असल्याचा गंभीर आरोप काँग्रेस नगरसेवक आझाद खान यांनी केला आहे. या सर्व प्रकरणाची चौकशी करत गरिबांना न्याय द्या अशी मागणी त्यांनी केली. लाखो रुपयांच्या या घोटाळ्याची चौकशी करण्याची गंभीर मागणी आझाद खान यांनी केली आहे. या प्रकरणात निविदा प्रक्रियेला का बायपास केले आणि खरोखर इतके लोक तिथे राहतात काय हा संशोधनाचा विषय आहे.

## ओपन स्पेस घोटाळ्यात सागर भारुका यांचे बेछूट आरोप; एक हजार कोटींचा ओपन स्पेस घोटाळा?

**अकोला :** महापालिकेत नेहमी चर्चेत राहणारे शिवसेना नगरसेवक सागर भारुका यांनी महासभेत मोठा धमाका केला. त्यांनी थेट आयुक्तांवर गंभीर आरोप करत त्याची कागद पत्रेच दाखविली. त्यामुळे सभागृह पुर्णवेळ स्तब्ध होते. भूमि अभिलेख विभागातील निलंबित अधिकारी आणि महापालिकेतील अधिकाऱ्यांनी हा ओपन स्पेस घोटाळा केल्याचा आरोप सागर भारुका



यांनी केला. सागर भारुका यांनी ज्या जमीनीचा उल्लेख केला ती कधी सरकारी होती. कधी ती खाजगी होती. तर पुन्हा ती कशी सरकारी झाली. यात मोठ्या प्रमाणात अधिकाऱ्यांनी अर्थात आयुक्त व महापालिका कर्मचाऱ्यांनी हेराफेरी केल्याचा आरोप आपण आत्ताच पाहिला. या विषयीचे कागद पत्रेच शिवसेना नगरसेवक सागर भारुका यांनी आर आर सी न्यूजला दाखविले. त्याच बरोबर सागर भारुका यांनी आर आर सी न्यूज ने ओपन स्पेस घोटाळा जनतेसमोर आणल्यानंतर त्यांना ही कागदपत्रे मिळाल्याचा दावा केला आहे.

## हिवरखेड पोलिसांनी दिले २ गोऱ्ह्यांना जीवनदान

**हिवरखेड :** येथील १३२ केव्ही मार्गापासून तर बगीच्या प्लॉट या मार्गावर दिनांक २२ जून रोजी दोन गुरे पोलिसांना गोपनीय माहितीवरून आढळून आली. गुरे हाकलणाऱ्याला पोलिसांनी विचारपूस केली असता , त्याने कत्तलीसाठी नेत असल्याची कबुली पोलिसांना दिली, आरोपी नूरखा जमशेर खा वय (४६ वर्षे) रा. मेनरोड बंदूकपुरा हिवरखेड याच्या विरुद्ध कलम ५५ (क) ९९(५)

यासह कलम ११ प्राणीछळ कायदा अतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला, लाल व पांढऱ्यां रंगाच्या या दोन गुरांना पोलिसांनी गोरक्षणाच्या स्वाधीन केले. ही गुरे अंदाजे ५०, हजार किमतीची असल्याचे समजते या कारवाईचा पुढील तपास हिवरखेड ठाणेदार सचिन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पंकज माळवी , प्रमोद चव्हाण, आनंद पाटील करीत आहेत.

## वरुर जऊळकाला अतिक्रमण हटत नाही तोपर्यंत उपोषण सुटणार नाही

प्रतिनिधी २४ जून

**अकोट :** तालुक्यातील वरुर गावात वार्ड क्रमांक एक मध्ये सार्वजनिक वहिवाटीच्या रस्त्यावर झालेल्या सहा महिन्यापासून अतिक्रमणामुळे ग्रामस्थांचा संताप तीव्र झाला असून तात्काळ कारवाई न झाल्यास ग्रामपंचायत वरुर विटाळी व ग्रामपंचायत सचिवां विरोधात पंचायत समिती अकोट कार्यालया दालनात जनआंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.



अनंता वसंतराव धनबहादूर यांनी ग्रामपंचायत प्रशासनाकडे दिलेल्या लेखी तक्रारीत श्रीकांत दादाराव धनबहादूर यांचे घरकुल बांधकाम मूळ हद्दीपलीकडे जात असल्याचा आरोप केला आहे. तसेच श्रीकांत धनबहादूर, दादाराव धनबहादूर, निशांत धनबहादूर व माजी ग्रामपंचायत सदस्य जिजा धनबहादूर यांनी सार्वजनिक रस्त्यावर शौचालय टाके, ओटा व काँक्रीट स्लॅबचे बांधकाम करून रस्त्याची रुंदी कमी केल्याचा गंभीर दावा करण्यात आला आहे. गावातील नागरिक, शेतकरी, विद्यार्थी तसेच वाहनधारकांना या अतिक्रमणाचा मोठा फटका बसत आहे.

बैलगाड्या, ट्रॅक्टर, कापूस भरलेल्या ट्रॉली व इतर जड वाहनांची वाहतूक अडखळत असून अनेकदा वादाचे प्रसंग निर्माण होत आहेत.

भविष्यात मोठी दुर्घटना, मारामाऱ्या किंवा जीवितहानीची घटना घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित प्रशासनावर राहील, असा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

वारंवार तक्रारी करूनही ग्रामपंचायत प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. अतिक्रमण हटवून सार्वजनिक रस्ता पूर्ववत मोकळा करावा, अन्यथा जवळपास १००० ते १५०० गावकरी एकत्र येऊन ग्रामपंचायत व सचिवांच्या निष्क्रियतेविरोधात पंचायत समिती अकोट कार्यालय दालनात तीव्र आंदोलन छेडतील, असा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे.

या प्रकरणाची प्रत गटविकास अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक, जिल्हा पोलीस अधीक्षक, जिल्हाधिकारी, तहसीलदार व ठाणेदार यांना पाठविण्यात आली आहे. सात दिवसांत अतिक्रमण हटवून संबंधितांवर कारवाई न झाल्यास २२ जून २०२६ पासून बेमुदत उपोषण व जनआंदोलन करण्यात येणार असल्याचा स्पष्ट इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.



सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
बुधवार, दि. २४ जून २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

## 'केपीजीएस'तर्फे परिसर सफाई उपक्रम

प्रतिनिधी २४ जून

**यवतमाळ :** योग दिनानिमित्त कोया पुनेम गोटुल समितीच्या वतीने धनलक्ष्मी भिवसन पेनठाणा वडगाव येथे योगसाधना, परिसर सफाई आणि वृक्षारोपण उपक्रम राबविण्यात आला. यावेळी योगसाधना दशरथ ताडाम यांच्या मार्गदर्शनात घेण्यात आली. वृक्षारोपण करुन वृक्ष संवर्धनाची जबाबदारी देण्यात आली. कोया पुनेम गोटुल समितीने 'एक झाड लावा, निसर्ग वाचवा' हा उपक्रम सुरू केला आहे. या अंतर्गत निसर्ग रक्षक पुरस्कार दिला जाणार असल्याचे सांगण्यात आले.

याप्रसंगी समितीचे जिल्हाध्यक्ष गुलाबराव मेश्राम, जिल्हा सचिव लक्ष्मणराव कुळसंगे, धनलक्ष्मी भिवसन पेनठाणा वडगाव समितीचे अध्यक्ष मधुकरराव सोयाम, सचिव डॉ. दीपक नैताम, विनोद उईके, शारदा उईके, डॉ. जयश्री नैताम, विष्णुपंत मेश्राम, बाबाराव उईके, प्रा. किरण अनाके, अविनाश मोकाशे, शेषराव उईके, गणेश पेंदाम आदी उपस्थित होते.

# 'टीबी लँड' व्यवहारावर संशयाचे सावट; 95 कोटींच्या करारात 300 कोटींच्या मालमत्तेचा सौदा?

### एफएसआय वाढ, नऊ निविदा व मूल्यांकनात तफावत; उच्च न्यायालयात धाव घेणार

### नगरसेवक संतोष बोरेले यांची पत्रकार परिषदेत माहिती

प्रतिनिधी २४ जून

**यवतमाळ :** यवतमाळ नगर परिषदेच्या मालकीच्या टीबी रुग्णालयाच्या भूखंडाच्या विकास प्रकल्पात मोठ्या प्रमाणावर अनियमितता, आर्थिक नुकसान आणि भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर आरोप काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष तथा नगर परिषद सदस्य संतोष बोरेले यांनी केला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल करणार असल्याची माहिती त्यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली.

बोरेले यांनी सांगितले की, शहरातील टीबी रुग्णालयाचा सुमारे १६ हजार ५७४ चौरस मीटर क्षेत्रफळाचा भूखंड बीओटी (बिल्ड-ऑपरेट-ट्रान्सफर) तत्त्वावर ९० वर्षांच्या भाडेपट्ट्याने देण्याचा निर्णय घेण्यात आला. या भूखंडाचे बाजारमूल्य सुमारे ३०० कोटी रुपये असताना अवघ्या ९५ कोटी रुपयांत करार करण्यात आल्याचा त्यांचा आरोप आहे. या व्यवहारामुळे नगर परिषदेचे मोठे आर्थिक नुकसान झाल्याचा दावा त्यांनी केला.

या प्रकरणात भूखंडाचे चार वेळा मूल्यांकन करण्यात आले असून मूल्यांकनाचा दर कमी करण्यासाठी विविध पद्धती वापरण्यात आल्याचा आरोप बोरेले यांनी केला. रेडीरेकनर दर, बांधकाम खर्च, जोखीम घटक तसेच घसारा यांचा वापर करून भूखंडाचे मूल्य कृत्रिमरीत्या कमी करण्यात आले, असा दावा त्यांनी केला. अंतिम मूल्यांकन सुमारे ८९.८२ कोटी रुपये दाखविण्यात आल्याने व्यवहारावर संशय निर्माण झाल्याचे त्यांनी नमूद केले.

एफएसआयच्या गणनेतही गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप करताना बोरेले म्हणाले की, शासनाच्या पत्रांमध्ये प्रत्यक्ष विकासासाठी ९,४९७ चौरस मीटर जागा वापरण्याचा उल्लेख आहे. मात्र, पार्किंगसाठी राखीव असलेल्या ५,४५२ चौरस मीटर जागेचाही एफएसआय गणनेत समावेश करून कंत्राटदाराला अतिरिक्त बांधकामाची परवानगी देण्यात आली. त्यामुळे नगर परिषदेच्या ताब्यात राहणारी पार्किंगची जागा भविष्यात उपयोगाची राहणार नसल्याचा दावा त्यांनी केला.

प्रकल्पासाठी आवश्यक असलेली तांत्रिक मंजुरी घेण्यात आली नसल्याचा आरोपही त्यांनी केला. तसेच २० हजार चौरस मीटरपेक्षा अधिक बांधकामासाठी आवश्यक असलेली पर्यावरणीय मंजुरी घेतली गेली की नाही, याबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आला. संबंधित अधिकाऱ्यांनी शासनाच्या स्थायी निर्देशांचे उल्लंघन केल्याचा आरोपही त्यांनी केला.

> ■ "संपूर्ण प्रकरणात नियमबाह्य निर्णय, आर्थिक गैरव्यवहार आणि भ्रष्टाचार झाल्याचा संशय आहे. त्यामुळे या व्यवहाराची न्यायालयीन आणि स्वतंत्र चौकशी होणे आवश्यक आहे," असे बोरेले यांनी सांगितले.

या प्रकल्पासाठी २०१९ ते २०२६ या कालावधीत तब्बल नऊ वेळा निविदा काढण्यात आल्याचे सांगत बोरेले यांनी निविदांच्या अटी वारंवार शिथिल करून विशिष्ट कंत्राटदार किंवा कंपनीला लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप केला. तसेच भूखंडावरील अतिक्रमणधारक दुकानदार आणि कुटुंबांच्या पुनर्वसनाबाबत शासनाने निर्देश दिले असतानाही त्यांची उपेक्षा करण्यात आल्याचा दावा त्यांनी केला. याशिवाय नगर परिषदेकडून 'एम्पॅनलमेंट'च्या नावाखाली निविदा प्रक्रिया न राबविता कोट्यवधी रुपयांची कामे काही कंत्राटदारांना देण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला. सुमारे १२.४८ कोटी रुपयांच्या कामांपैकी ४.२२ कोटी रुपयांची देयके अदा करण्यात आली असून ८.२५ कोटी रुपये थकीत असल्याचे त्यांनी सांगितले. नगर परिषदेच्या निधीत अवघे ३० लाख रुपये शिल्लक असताना अशा प्रकारची आर्थिक बांधिलकी निर्माण करण्यात आल्याबद्दल त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

## भर पावसात खा. संजय देशमुखांचे शक्तिप्रदर्शन

### शिवसेना पदाधिकाऱ्यांची उपस्थिती; भाजपच्या अनुपस्थितीची चर्चा

प्रतिनिधी २४ जून




**दिग्रस :** शिंदेसेनेत प्रवेश केल्यानंतर यवतमाळ-वाशीम लोकसभा मतदारसंघाचे खासदार संजय देशमुख यांचे सोमवारी रात्री दिग्रसमध्ये आगमन होताच समर्थकांनी जल्लोषपूर्ण स्वागत केले. मुसळधार पाऊस सुरू असतानाही मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित राहिल्याने हा स्वागत सोहळा चर्चेचा विषय ठरला.

खासदार देशमुख यांचे आगमन दुपारी अपेक्षित होते. मात्र विविध कारणांमुळे त्यांचा दौरा उशिरा झाला. तरीही कार्यकर्त्यांनी पावसाची पर्वा न करता शहरात ठिय्या देत प्रतीक्षा केली. रात्री त्यांच्या आगमनानंतर घोषणाबाजी, फटाक्यांची आतषबाजी आणि ढोल-ताशांच्या गजरात स्वागत करण्यात आले.

आर्णी नाका परिसरापासून स्वागत मिरवणुकीला प्रारंभ झाला. शहरातील विविध ठिकाणी स्वागत कमानी उभारण्यात आल्या होत्या. पुष्पवृष्टी, हारतुरे आणि सत्कार सोहळ्यांमुळे वातावरण उत्साहपूर्ण झाले होते. युवक कार्यकर्त्यांचा सहभाग विशेष लक्षवेधी ठरला.

शिवसेनेतील प्रवेशानंतर प्रथमच दिग्रसमध्ये येत असल्याने जिल्ह्यातील शिवसेनेचे अनेक पदाधिकारी, माजी लोकप्रतिनिधी, नगरसेवक आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवसेनेच्या वतीने खासदार देशमुख यांचा सत्कार करण्यात आला.

दरम्यान, स्वागत सोहळ्यात महायुतीतील घटक पक्ष भाजपचे स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्ते अनुपस्थित राहिल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली. या अनुपस्थितीमागील कारणांबाबत विविध तर्कवितर्क व्यक्त केले जात आहेत.

राजकीय निरीक्षकांच्या मते, या स्वागत सोहळ्याच्या निमित्ताने खासदार देशमुख यांच्या समर्थकांची संघटनात्मक ताकद पुन्हा एकदा दिसून आली.

शिवसेनेतील त्यांच्या प्रवेशानंतर जिल्ह्यात निर्माण झालेल्या नव्या राजकीय समीकरणांची झलक या कार्यक्रमातून पाहायला मिळाली. त्यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका आणि जिल्ह्यातील राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर या शक्तिप्रदर्शनाकडे विशेष महत्त्वाने पाहिले जात आहे.

## वीज कोसळून युवकाचा मृत्यू; वृद्ध गंभीर जखमी

प्रतिनिधी २४ जून



**उमरखेड :** तालुक्यातील भोजनगर (कुरळी) तांडा शिवारात मंगळवारी दुपारी विजेच्या कडकडाटासह झालेल्या वादळी पावसादरम्यान वीज कोसळून एका युवकाचा जागीच मृत्यू झाला, तर एक वृद्ध गंभीर जखमी झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

महेश गणेश आडे (वय २२, रा. भोजनगर तांडा) असे मृत युवकाचे नाव असून, काळू कनीराम पवार (वय ७०, रा. भोजनगर तांडा) हे गंभीर जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, गणेश फकीरा आडे, त्यांचा मुलगा महेश आडे आणि काळू पवार हे मंगळवारी दुपारी शेतशिवारात जनावरे चारण्यासाठी गेले होते. दुपारी सुमारे २ वाजताच्या सुमारास विजेच्या कडकडाटासह वादळी पाऊस सुरू झाल्याने तिघांनी शेतातील एका झाडाखाली आश्रय घेतला.

दरम्यान, जनावरे बाजूला जात असल्याचे लक्षात येताच महेश आडे त्यांना हाकलण्यासाठी झाडापासून सुमारे ५० ते ६० फूट अंतरावर गेले. त्याचवेळी अचानक त्यांच्या अंगावर वीज कोसळली. यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. तसेच विजेच्या धक्क्यामुळे काळू पवार हे गंभीर जखमी झाले.

घटना घडताच गणेश आडे यांनी गावात धाव घेऊन माहिती दिली. ग्रामस्थांनी तत्काळ घटनास्थळी पोहोचून जखमींना फुलसावंगी येथील रुग्णालयात दाखल केले. तेथे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी महेश आडे यांना मृत घोषित केले.

महेश आडे यांच्या अकाली निधनामुळे भोजनगर तांडा व परिसरात शोककळा पसरली असून, ग्रामस्थांकडून हळहळ व्यक्त केली जात आहे.

## वीज कोसळून दोघांचा मृत्यू; युवक गंभीर जखमी

प्रतिनिधी २४ जून

**कळंब :** कळंब तालुक्यातील उमरी शेतशिवारात मंगळवारी (२३ जून) दुपारी झालेल्या दुर्दैवी घटनेत वीज कोसळून दोन शेतकऱ्यांचा जागीच मृत्यू झाला, तर एक युवक गंभीर जखमी झाला. या घटनेमुळे उमरी परिसरात शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, भीमराव रामभाऊ लाटकर (५५), साहिल भीमराव लाटकर (२२) आणि निखिल वाल्मिक भोयर (४०) हे तिघेही शेतात काम करत असताना दुपारी सुमारे ३.५० वाजण्याच्या सुमारास विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाला सुरुवात झाली. त्याचवेळी त्यांच्या अंगावर वीज कोसळली. या दुर्घटनेत भीमराव रामभाऊ लाटकर आणि निखिल वाल्मिक भोयर यांचा जागीच मृत्यू झाला. तर साहिल भीमराव लाटकर गंभीर जखमी झाला. त्याला तत्काळ राळेगाव येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी त्याला वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ येथे हलविण्यात आले असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत.घटनेची माहिती मिळताच महसूल व पोलीस प्रशासनाने घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. अचानक घडलेल्या या दुर्घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त होत असून मृतांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. दरम्यान, पावसाळ्यात विजांचा कडकडाट सुरू असताना शेतकरी व शेतमजुरांनी मोकळ्या शेतात किंवा झाडाखाली थांबणे टाळावे, तसेच सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले.

## मोटारसायकल चोरीचा पर्दाफाश; तीन आरोपी जेरबंद

प्रतिनिधी २४ जून



**यवतमाळ :** यवतमाळ ग्रामीण पोलिसांनी मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्याचा छडा लावत तीन आरोपींना अटक केली असून त्यांच्याकडून ३ लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपींकडून आणखी चोरीच्या वाहनांचा उलगडा होण्याची शक्यता असल्याने पोलिसांनी त्यांची कसून चौकशी सुरू केली आहे.

बाभुळगाव तालुक्यातील सावर येथील नासिर खान नूर खान (वय ५४) यांनी २२ जून रोजी यवतमाळ ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यांच्या घरासमोर उभी असलेली एमएच-२९ एएल-५९५६ क्रमांकाची पांढऱ्या रंगाची ज्युपिटर मोपेड अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याचे त्यांनी तक्रारीत नमूद केले होते. याप्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्ह्याचा तपास सुरू असताना यवतमाळ ग्रामीणचे ठाणेदार प्रविण मानकर यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार पांढरी (लोहारा) येथील शिवम उर्फ शिवा महेंद्रसिंग परिहार (वय २६) याला ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान त्याने साथीदार सतनलाल रतनलाल कोसरे (वय २०) व गणेश वामनराव उईके (वय २८) यांच्या मदतीने ज्युपिटर मोपेड चोरी केल्याची कबुली दिली.

तपासादरम्यान आरोपींनी यवतमाळ व अमरावती जिल्ह्यातील विविध भागांतून मोटारसायकली चोरी केल्याचेही उघड झाले. त्यानंतर पोलिसांनी घरझडती घेतली असता तीन हिरो स्प्लेंडर मोटारसायकली (किंमत १ लाख ८० हजार रुपये), एक बजाज ऑटो (१ लाख ५० हजार रुपये), एका स्प्लेंडरचे सुटे भाग (३० हजार रुपये), सबमर्सिबल मोटार पंप व इतर साहित्य असा एकूण ३ लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

सर्व आरोपींना अटक करण्यात आली असून अधिक तपासासाठी त्यांची पोलीस कोठडी घेण्यात आली आहे. आरोपींकडून आणखी चोरीच्या वाहनांचा उलगडा होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश बैसाने यांच्या मार्गदर्शनाखाली यवतमाळ ग्रामीणचे ठाणेदार प्रविण मानकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक विजयमाला रिठे, सहाय्यक फौजदार गजानन खांदवे, पोलीस हेडकॉन्स्टेबल सचिन हुमने, निरज पातुरकर, निलेश सिरसाट, पोलीस कॉन्स्टेबल तुषार जाधव व चालक पोलीस कॉन्स्टेबल रुपेश नेवारे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

## आरोग्य केंद्रात मोबाइलच्या टॉर्चवर रुग्णसेवा

प्रतिनिधी २४ जून

**सावळी सदोबा :** परिसरातील नागरिकांच्या आरोग्याची जबाबदारी सांभाळणाऱ्या सावळी सदोबा प्राथमिक आरोग्य केंद्रातील धक्कादायक वास्तव समोर आले आहे. वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर रुग्णांवर उपचार करण्यासाठी कोणतीही पर्यायी व्यवस्था उपलब्ध नसल्याने डॉक्टर आणि आरोग्य कर्मचाऱ्यांना चक्क मोबाइलच्या टॉर्चच्या उजेडात रुग्णांची तपासणी व उपचार करावे लागत आहेत. त्यामुळे आरोग्य विभागाच्या नियोजनावर आणि कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रात साधी जनरेटर किंवा इन्व्हर्टरची व्यवस्था नसणे ही बाब संतापजनक असल्याची प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे. आपत्कालीन परिस्थितीत उपचारासाठी आलेल्या रुग्णांना अंधारात बसून राहावे लागत असेल, तर आरोग्य यंत्रणा नेमकी कोणासाठी काम करत आहे, असा सवाल उपस्थित केला जात आहे. रात्रीच्या वेळी सर्पदंश, अपघात, ताप, प्रसूतीसारख्या गंभीर रुग्णांवर उपचार करताना पुरेशा प्रकाशाची आवश्यकता असते. मात्र, सावळी सदोबा पीएचसीमध्ये वीज गेल्यानंतर मोबाइल टॉर्चच्या भरवशावर उपचार सुरू असल्याचे वास्तव समोर येत आहे. ही परिस्थिती केवळ रुग्णांसाठीच नव्हे तर वैद्यकीय कर्मचाऱ्यांसाठीही धोकादायक ठरत आहे. ही गंभीर बाब लक्षात घेऊन संबंधित वरिष्ठांनी तातडीने उपाययोजना कराव्या, अशी मागणी आहे.

## तहसीलदार व ग्राम महसूल अधिकाऱ्यांच्या निलंबनाचा वाद चिघळला

### विदर्भ पटवारी संघाचे उमरखेड उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन; आंदोलनाचा इशारा



**मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा**

■ विदर्भ पटवारी संघाच्या जिल्हा शाखेने यापूर्वी १८ जून २०२६ रोजीही या संदर्भात निवेदन दिले होते. त्यानंतर २२ जून रोजी उमरखेड उपविभागाच्या वतीने अध्यक्ष राजकुमार पी. गरूडे आणि सचिव संजयकुमार एम. धुळे यांच्या स्वाक्षरीने उपविभागीय अधिकारी कार्यालयात निवेदन सादर करण्यात आले. प्रशासनाने मागण्यांवर त्वरित सकारात्मक निर्णय न घेतल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा संघटनेने दिला आहे.

प्रतिनिधी २४ जून

**उमरखेड :** नेर तालुक्यातील चार ग्राम महसूल अधिकाऱ्यांच्या निलंबनाच्या कारवाईवरून महसूल विभागात वाद निर्माण झाला असून, ही कारवाई विनाअट मागे घेण्याची मागणी विदर्भ पटवारी संघाने केली आहे.

तसेच नेरचे तहसीलदार पुरुषोत्तम भुसारी यांच्या कामकाजाची चौकशी करून त्यांच्यावर तातडीने कारवाई करावी, अशी मागणीही संघटनेने केली आहे.

या संदर्भात विदर्भ पटवारी संघ, नागपूर विभागाच्या उमरखेड उपविभागाच्या वतीने उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांना निवेदन सादर करण्यात आले.

संघटनेच्या म्हणण्यानुसार, नेर तालुक्यातील तलवाडासह विविध क्षेत्रांतील चार ग्राम महसूल अधिकाऱ्यांवर करण्यात आलेली निलंबनाची कारवाई अन्यायकारक असून ती तातडीने रद्द करण्यात यावी.

निवेदनात तहसीलदार पुरुषोत्तम भुसारी यांच्या कार्यपद्धतीवरही आक्षेप नोंदविण्यात आला आहे. महसूल कर्मचाऱ्यांवर होत असलेल्या कारवाईमुळे असंतोष निर्माण झाला असून, प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर योग्य ती प्रशासकीय कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

यासोबतच ग्राम महसूल अधिकारी संवर्गाच्या विविध प्रलंबित मागण्या तातडीने मार्गी लावाव्यात, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

## दिग्रसमध्ये दमदार पावसाची हजेरी; बळीराजा सुखावला

प्रतिनिधी २४ जून

**दिग्रस :** दिग्रस शहरासह तालुक्यात सोमवारी रात्री व मंगळवारी दुपारी झालेल्या दमदार पावसाने बळीराजाच्या आशा पल्लवित केल्या आहेत. गेल्या काही दिवसांपासून वाढलेली उष्णता, दमट वातावरण आणि असह्य उकाड्यामुळे हैराण झालेल्या नागरिकांना या पावसामुळे मोठा दिलासा मिळाला.

दुपारपर्यंत कडक ऊन आणि उकाड्याने नागरिक त्रस्त झाले होते. मात्र अचानक आकाशात काळे ढग दाटून आले आणि विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाला सुरुवात झाली.

सुमारे तासभर कोसळलेल्या पावसामुळे शहरातील अनेक रस्त्यांवर पाण्याचे प्रवाह वाहताना दिसून आले. पावसानंतर वातावरणात गारवा निर्माण झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर या पावसाचे विशेष महत्त्व आहे. अनेक शेतकऱ्यांनी पेरणीची तयारी पूर्ण केली असून चांगल्या पावसाच्या प्रतीक्षेत होते. दमदार पावसामुळे जमिनीत पुरेसा ओलावा निर्माण झाला असून पेरणीच्या कामांना वेग येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे शेतकरी वर्गात उत्साहाचे वातावरण आहे.

पावसाचा आनंद लुटण्यासाठी लहान मुले आणि युवक रस्त्यावर उतरले होते. काही ठिकाणी नागरिकांनी गरम भजी आणि चहाचा आस्वाद घेत पावसाचे स्वागत केले.

हवामान विभागाने पुढील काही दिवस जिल्ह्यात पावसाचा जोर कायम राहण्याचा अंदाज व्यक्त केला असून शेतकऱ्यांनी हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन शेतीची कामे नियोजनबद्ध करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी पुसद जि. यवतमाळ यांचे कार्यालय, पुसद**

**जाहिरनामा**

एम.आर.सी. 81/140/2026
तहसिल कार्यालय, पुसद
दिनांक 15/05/2026

आवेदक - श्री.सौ. शेख रुबीनाबी शेख मुनीर
रा. कलमनुरी ता. पुसद जि. यवतमाळ
अनावेदक - नगर परिषद, पुसद सचिव, ग्राम पंचायत
कलमनुरी ता. पुसद जि. यवतमाळ ईसापुर

ज्याअर्थी अर्जदार नामे श्री. सौ शेख रुबीनाबी शेख मुनीर पुसद जि. यवतमाळ यांनी त्यांचे स्वतः नामे श्री/सी/श्रीमती शेख रुबीनाबी शेख म. मुनीर राइसापूर यांच्या जन्माची / मृत्यूची नोंद न्यायालयात जन्म / मृत्यू नोंदणी कायद्याचे कलम 13 (3) प्रमाणे दिनांक 01/01/1985 रोजी त्यांच्या जन्म / मृत्य त्यांचे राहत्या घरी मौजा इसापूर ता. पुसद जि. यवतमाळ येथे झाला आहे. या बाबत यांच्या जन्माची / मृत्यूची नोंद सचिव, ग्रामपंचायत इसापूर पंचायत समिती पुसद यांना घेण्याकरीता आदेश देण्यात यावा याकरीता दि. 26/02/2026 रोजी अर्ज या कार्यालयास प्राप्त झाले आहे. या करीता एम.आर.सी. 81/140/2026 तहसिल कार्यालय, पुसद च्या वतीने सचिव, ग्रामपंचायत इसापूर यांना पत्र देण्यात येत आहे. ज्याअर्थी सर्वत्र जनतेस या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार नामे, श्री. शेख रुबीनाबी शेख मुनीर रा. कलमनुरी स्वतः आई/ मुलगा/ मुलगी / वडील / भाऊ / बहिण/पूतण्या/आजोबा / पती /पत्नी नामे श्री. सौ. शेख रुबीनाबी शेख म. मुनीर रा इसापूर ता. पुसद यांच्या जन्माची / मृत्यूची नोंदणी बाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असेल तर त्यांनी हि जाहिर नोटीस प्रकाशित झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या कार्यालयात आपण स्वतः हजर अगर आपले वकिला मार्फत हजर राहुन आपली हरकत अथवा आक्षेप लेखी स्वरुपात नोंदवावा, अन्यथा कोणालाही काहीही सांगवयाचे नाही असे गृहीत धरुन सदरहु अर्जदाराचा अर्ज निकाली काढण्यात येईल यांची नोंद घ्यावी. आज दिनांक 15/05/2026 रोजी माझ्या सहीने व शिक्यानिशी दिली आहे.

स्वा./-
शिक्का
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, पुसद**

# सिटी न्यूज अमरावती

बुधवार, दि. २४ जून २०२६

http://epaper.citynewssuperfast.com


## ‘मोदी सरकारची १२ वर्षे’ महा-अभियान: खा. डॉ. अनिल बोंडे यांच्या मार्गदर्शनात डॉक्टरांशी संवाद, केंद्र सरकारच्या आरोग्य योजनांवर चर्चा

**अमरावती :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या यशस्वी आणि दूरदर्शी नेतृत्वाखाली केंद्र सरकारच्या ऐतिहासिक कामगिरीला १२ वर्षे पूर्ण झाली आहेत. या निमित्ताने भारतीय जनता पार्टीच्या वतीने देशभरात विशेष महा-अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत अमरावती येथे भाजपचे ज्येष्ठ नेते तथा खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि मार्गदर्शनात वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांशी संवाद साधून केंद्र सरकारच्या कल्याणकारी योजनांची माहिती देण्यात आली. या महा-अभियानाचे 'महाराष्ट्र प्रदेश सहसंयोजक' आणि खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्या नेतृत्वाखालील टीमने अमरावती येथील प्रसिद्ध 'श्रीकृष्ण आरोग्यम्' हॉस्पिटलला भेट दिली.

# समतेचा आणि भक्तीचा वारसा जपणाऱ्या रुख्मिणी मातेच्या पालखीचे अंबानगरीत जल्लोषात स्वागत

प्रतिनिधी २४ जून

## माजी आमदार ॲड. यशोमती ठाकूर व खासदार बळवंत वानखडे यांच्या हस्ते स्वागत





**अमरावती :** श्रीक्षेत्र कौंडण्यपूर येथून श्रीक्षेत्र पंढरपूरकडे आषाढी एकादशी सोहळ्यासाठी प्रस्थान करणाऱ्या माता रुख्मिणीच्या पवित्र पालखीचे अंबानगरीतील बियाणी चौकात माजी आमदार ॲड. यशोमती ठाकूर तसेच खासदार बळवंत वानखडे यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने स्वागत करण्यात आले. सर्वधर्मीय नागरिक, वारकरी, भाविक आणि मान्यवरांच्या उपस्थितीमुळे हा स्वागत सोहळा सामाजिक एकात्मतेचा आणि समतेचा संदेश देणारा ठरला.

श्रीक्षेत्र कौंडण्यपूर येथून श्रीक्षेत्र पंढरपूर येथे आषाढी वारीसाठी जाणाऱ्या रुख्मिणी मातेच्या पालखीची यंदाची ४३२ वी परंपरागत वारी भक्तिमय वातावरणात पार पडत आहे. अनेक शतकांपासून अखंड सुरू असलेली ही परंपरा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वैभवाचे प्रतीक मानली जाते.

रुख्मिणी मातेच्या पालखीला श्रीक्षेत्र पंढरपूर येथे मानाचे स्थान प्राप्त व्हावे तसेच शासकीय पूजनाचा सन्मान मिळावा यासाठी माजी आमदार ॲड. यशोमती ठाकूर यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळून आज रुख्मिणी मातेच्या पालखीला पंढरपूर येथे मानाचे स्थान प्राप्त झाले आहे. त्याचप्रमाणे अमरावती शहरात पालखी आगमनानंतर बियाणी चौकात स्वागत करण्याची परंपराही त्यांनीच सुरू केली असून ती आजही अविरतपणे सुरू आहे.

**सर्वधर्मसमभावाचे दर्शन घडविणारा सोहळा**

तिवसा विधानसभा मतदारसंघातील तसेच अमरावती शहर व ग्रामीण भागातील विविध समाजघटकांचे नागरिक, वारकरी, प्रतिष्ठित व्यक्ती आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सर्व धर्म, पंथ आणि समाजातील नागरिकांच्या सहभागामुळे हा सोहळा सामाजिक ऐक्य, बंधुभाव आणि सर्वधर्मसमभावाचा संदेश देणारा ठरला.

डोळ्यांचे पारणे फेडणाऱ्या या स्वागत सोहळ्याला खासदार बळवंत वानखडे, अमरावती काँग्रेस जिल्हाध्यक्ष बब्लूभाऊ देशमुख , माजी आमदार वीरेंद्रभाऊ जगताप, माजी महापौर विलास इंगोले, बबलू शेखावत, अनिल अग्रवाल,

शहर पोलीस आयुक्त राकेश ओला, निवासी जिल्हाधिकारी संतोष काकडे, उपविभागीय अधिकारी अनिल भटकर, अमरावती पोलिस उपायुक्त श्याम घुगे, पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव, अमरावती कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती हरिष मोरे, सुरेश रतावा, संजय शिरभाते, जयंतराव देशमुख, अभय देशमुख, श्याम बेलसरे, श्रीकांत बोंडे, गजानन देशमुख, मुकद्दर पठान, दिलीप सोनोने, नाना नागमोते, अविनाश भडांगे, महेश राऊत, विनोद वानखडे, शरद वानखडे, मुकुंद पुणसे, पंकज देशमुख,संदीप आमले, संजय चौधरी, अभिजीत बोके, जितेंद्र ठाकूर, शैलेष काळबांडे, प्रतिभाताई गौरखेडे, अनिकेत देशमुख, वैभव वानखडे, रितेश पांडव, वीरेंद्र भट, किशोर चांगोले, सतीश पोजगे, रवी हांडे, संजय मार्डीकर, संजय कळसकर, सचिन ठोके, सुनील जुनघरे, प्रणव गौरखेडे, नरू विघ्ने, अंजली ठाकरे आदी मान्यवर सहकुटुंब उपस्थित होते. तसेच शहरातील भाविकही मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

**बियाणी चौकात भक्तीरसाला उधाण**

सायंकाळी पालखीचे बियाणी चौकात आगमन होताच टाळ-मृदंगाच्या गजरात, ‘ज्ञानोबा-तुकाराम’ आणि ‘जय जय रुख्मिणी माते’ च्या जयघोषात संपूर्ण परिसर भक्तिमय झाला. पालखीचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. वारकऱ्यांच्या मुखी विठ्ठलनाम आणि वातावरणात भक्तीचा दरवळ असा मंगलमय सोहळा अनुभवण्यास मिळाला.

**माजी आमदार ॲड. यशोमती ठाकूर यांचा वारकऱ्यांसोबत भक्तिभावाचा सहभाग**

पालखी स्वागत सोहळ्यानंतर माजी आमदार ?ड. यशोमती ठाकूर यांनी वारकऱ्यांसोबत फुगडी खेळत भक्तिरसात सहभागी होत उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. यावेळी त्यांनी काही अंतरापर्यंत पालखी खांद्यावर घेत वारकरी परंपरेप्रती असलेली आपली निष्ठा आणि श्रद्धा व्यक्त केली.

# गाडगेबाबा गोरक्षण संस्था स्थळावर विठ्ठल नामाचा गजर

प्रतिनिधी २४ जून

## माहुली ( धांडे ) पालखीचे पर्यावरण संदेशासह पंढरपूरकडे प्रस्थान



**दर्यापूर :** सालाबादाप्रमाणे यंदाही तालुक्यातील माहुली ( धांडे ) येथील भक्त मंडळी द्वारे गाव ते पंढरपूर पालखी दिंडीचा शुभारंभ झाला . श्री नारायणगुरु महाराज मंदीर पूजनानंतर गावातून वाजगाजत निघाल्या नंतर आपल्या पाच वर्षांच्या परंपरे नुसार गाव शिवारात स्थापीत गाडगेबाबा गोरक्षण संस्थेच्या विशाल परिसरात सर्व भक्त मंडळी तथा संस्थेच्या गो सेवकांनी गोपूजन करून एकत्रित वृक्षारोपण केले . या वेळी सर्व उपस्थितांद्वारे केल्या गेलेल्या श्री विठ्ठल नामाच्या गजराने संपूर्ण गोरक्षण परीसर दणाणून गेला . पर्यावरण या विश्व सेवेचा संदेश देत या दिंडीने संस्थेद्वारे आयोजित अल्पोउपहार ग्रहण करून सुप्रसिद्ध शिंगणापूर काळा मारोती संस्थानकडे प्रवासाने प्रस्थान केले . पालखीचे पूजन गोरक्षण संस्थेचे कार्यकारिणी उपाध्यक्ष विजय पाटील धुमाळे ( साखरे ) यांनी केले . संस्थेचे व्यवस्थापक बाळासाहेब ( अनिल ) नामदेवराव भारसाकळे यांचा पालखी संचाद्वारे श्रीधरजी धांडे यांनी दैनंदीन गोसेवेबद्दल पालखीचा नारळ - दुपट्टा अर्पण करून गौरव केला . शेकडो पुरुष व महिला सहभागी असलेल्या या पालखीतील भक्तांच्या यथोचित अल्पोउपहार सेवा कार्यात वैभव ठाकरे, संदीप पवार ,आशिष ठाकरे, संतोष गवई, ज्ञानेश्वर गवई, अंकुश घरडे, श्रीकृष्ण पोटे यांचेसह संस्थेचे विश्वस्त प्रा गजानन भारसाकळे यांनीही सेवा दिली . श्री विठ्ठल दिंडी पालखी स्वागत परपंरा कायम राखल्या बद्दल संपूर्ण माहुली ( धांडे ) ग्राम वासियांनी गोरक्षण संस्थेचे आभार व्यक्त केले .

# अमरावती ग्रामीण पोलीस दलातर्फे जागतिक योग दिन उत्साहात साजरा.!



**अमरावती :** अमरावती ग्रामीण पोलीस घटका तर्फे जागतिक योग दिनानिमित्त २१ जुन २०२६ रोजी सकाळी ०६/०० वा. ते ०७/३० वा. दरम्यान जोग स्टेडियम, पोलीस मुख्यालय, अमरावती येथे जागतिक योग दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर जागतिक योग दिनास निकेतन कदम पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण व दत्ता तोटेवाड, अपर पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यावेळी पोलीस अधीक्षक यांनी योगाचे शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी असलेले महत्त्व अधोरेखित करून सर्व अधिकारी व अंमलदारांनी नियमित योगाभ्यास करण्याचे आवाहन केले. योगामुळे शरीर सुदृढ राहण्याबरोबरच मानसिक तणाव कमी होऊन कार्यक्षमता वाढते, असे त्यांनी मार्गदर्शनपर मनोगतात व्यक्त केले. सदर जागतिक योग दिनास योगाभ्यास करण्यासाठी सपोउपनि मोहन भारसाकळे, ब. नं. ११४६ नेमणूक पोलीस मुख्यालय, अमरावती ग्रामीण यांनी योगाचे प्रशिक्षण दिले.

# आ. संजय खोडके यांनी पावसाळी अधिवेशनात तालिका सभापती म्हणून सांभाळले कामकाज



**- सभागृह चालवितांना संसदीय अनुभव , शिस्त , संयम व सद्द्विवेक बुद्धीचा देखील घडवून दिला प्रत्यय**

**अमरावती :** राज्यविधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी विधान परिषदेतील कामकाजा दरम्यान पीठासीन सभापती राम शिंदे यांच्या अनुपस्थितीत तालिका सभापती म्हणून आ.संजय खोडके यांनी सभागृह चालविले. यावेळी सत्ताधारी पक्षाच्या वतीने आणलेल्या महाराष्ट्र विधान परिषद नियम २६० च्या प्रस्तावावर चर्चा सुरु असतांना पीठासीन तालिका सभापती संजय खोडके यांनी आपल्या संसदीय कामकाजाचा परिचय देऊन तब्बल दोन तास चांगल्या तऱ्हेने विधान परिषदेतील कामकाज चालविले.

महाराष्ट्र विधान परिषदेत सत्ताधारी पक्षाने नियम २६० नुसार महत्त्वाच्या सार्वजनिक मुद्द्यांवर चर्चेचा प्रस्ताव मांडण्यात आला. यावेळी सभागृहातील सदस्यांनी शेतकरी विकासाबरोबरच दुष्काळजन्य परिस्थिती, कर्जमाफी, विविध कृषी योजना , जलसंधारण अशा विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. हि चर्चा अत्यंत महत्वपूर्ण असतांना तालिका सभाध्यक्ष म्हणून विराजमान आमदार संजय खोडके यांनी तब्बल दोन तास चांगल्या तऱ्हेने सभागृह चालविले. त्यांनी नियोजित वेळेत प्रत्येक सदस्यांना बोलण्याची संधी दिली. तसेच सत्ताधारी सदस्यांबरोबरच विरोधी बाकावर बसलेल्या आमदारांचे सुद्धा म्हणणे ऐकून घेतले. सभागृहाचे कामकाज चालवीत असतांना तालिका सभाध्यक्ष आ. संजय खोडके यांनी आपल्या संसदीय कामकाजाचा परिचय देऊन अनुभव , शिस्त , संयम व सद्द्विवेक बुद्धीचा देखील प्रत्यय घडवून दिला. आ,संजय खोडके यांना विधान परिषदेमध्ये पीठासीन तालिका सभापती म्हणून पाहतांना अमरावतीकरांचे हृदय अभिमानाने भारावले होते.

# अमृत मानस मित्र मोफत प्रशिक्षण कार्यक्रमासाठी २९ जूनपर्यंत अर्ज करा

**अमरावती:** विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य, भावनिक सक्षमीकरण आणि समुपदेशन सेवा अधिक प्रभावी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था ’अमृत’ (AMRUT) च्या वतीने ’अमृत मानसमित्र’ समुपदेशक प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्यात येत आहे.

या अभिनव उपक्रमासाठी ’महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था’ (श्घ्श्), पुणे ही तांत्रिक व शैक्षणिक भागीदार म्हणून कार्यरत आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP 2020) नुसार शाळा व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांच्या समुपदेशनाची तरतूद असून, कौशल्याधारित शिक्षणावर भर देण्यासाठी हा अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या पहिल्या बॅचसाठी पात्र उमेदवारांना २९ जून २०२६ पर्यंत ऑनलाइन अर्ज करता येणार आहे. अशी माहिती अमृत संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे दिली आहे.

या कार्यक्रमांतर्गत निवड झालेल्या अमृतच्या लक्षित गटातील उमेदवारांना पुणे येथे १५ दिवसांचे मोफत ऑफलाइन प्रशिक्षण दिले जाईल. या अभ्यासक्रमात मानसिक आरोग्य, संवाद कौशल्ये, Active थ्रेहग्हु, संकट व्यवस्थापन आणि मानस सामाजिक सहाय्य यांसारख्या विषयांवर प्रत्यक्ष कार्यक्षम समुपदेशक विकसित करण्यावर भर दिला जाईल. १५ दिवसांच्या ऑफलाइन सत्रानंतर उमेदवारांना जिल्हा पातळीवरील शाळा किंवा महाविद्यालयाशी जोडून १ महिन्याचे प्रॅक्टिकल फिल्ड एक्सपोजर दिले जाईल. त्यानंतर पुढील ३ ते ५ महिने उमेदवारांना प्रत्यक्ष व्यवसायासाठी श्घ्श् चे मॉनिटरिंग, मेंटरिंग, नियमित ऑनलाइन सत्र आणि व्यावसायिक सहाय्य पुरवले जाईल. हे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्या उमेदवारांना ’अमृत’ व 'MIMH' यांचे संयुक्त अधिकृत प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल, ज्यामुळे त्यांना मानसिक आरोग्य क्षेत्रात तसेच सामाजिक संस्थांमध्ये रोजगार व करिअरच्या विविध सुवर्णसंधी उपलब्ध होतील.

या प्रशिक्षणासाठी एम.ए./एम.एस्सी. मानसशास्त्र, एम.ए./एम.एस्सी. समुपदेशन मानसशास्त्र किंवा मास्टर ऑफ सोशल वर्क (MSW) ही पदव्युत्तर पदवी असलेले उमेदवार पात्र आहेत. या क्षेत्रात पूर्वीपासून अनुभवी असलेल्या उमेदवारांना निवडीत प्राधान्य दिले जाईल. हे प्रशिक्षण पूर्णपणे मोफत असले, तरी उमेदवारांना निवास, भोजन व राहण्याची व्यवस्था स्वतःच्या खर्चाने करावी लागेल. इच्छुक उमेदवारांनी https://mahaamrut.org.in/ या संकेतस्थळावर सर्व आवश्यक कागदपत्रांसह ऑनलाइन अर्ज सादर करावा. प्राप्त अर्जांची छाननी करून, ओरिएंटेशन सत्र आणि आवश्यक परीक्षा किंवा मुलाखत घेऊन ’प्रथम येईल.

त्यास प्राधान्य’ या तत्त्वानुसार उमेदवारांची नावे निश्चित केली जातील. मानसिक आरोग्य क्षेत्रात अर्थपूर्ण करिअर घडवू इच्छिणाऱ्या युवक-युवतींनी या सुवर्णसंधीचा अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन श्घ्श् पुणे येथील तज्ज्ञ डॉ. कापसे यांनी केले आहे.

# गरिबांची ऑनलाइन फसवणूक करणारे आरोपी गजाआड

प्रतिनिधी २४ जून

## ग्रामीण पोलिसांची कामगिरी, एस पी निकेतन कदम यांनी दिली पत्र परिषदेत माहिती



**अमरावती :** गरिबांची ऑनलाईन फसवणूक व त्यानंतर लाखो रुपये लंपास करणारे आरोपी पोलिसांनी गजाआड केले आहे. यासंदर्भाची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी पत्र परिषद मध्ये आज दिली.

अमरावती जिल्ह्यामध्ये गरीब व मजूर वर्ग यांच्या असाह्यतेचा फायदा घेवून त्यांचे सोबत खोटे बोलून त्यांचेकडून सरकारी योजनेचा फायदा मिळविण्यासाठी बैंकेचे खाते काढण्यासाठी प्रेरीत करुन त्यांच्याकडून बैंकेचे पासबुक, ए.टी.एम. कार्ड, लिंक खात्याचे सिमकार्ड घेवून व त्याबदल्यात त्यांना किरकोळ मोबदला देवून त्यांचे बैंक खाते सायबर फसवणुकीचे गुन्ह्यात वापरण्यात आल्याच्या तक्रारी पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांचेकडे प्राप्त झाल्याने त्याबाबत पोलीस स्टेशन शिरखेड अमरावती ग्रा. येथे अपराध क्रमांक २१६/२०२६ कलम ३१६(२), ३१८(४)भा.न्या.सं. सहकलम ६६ (ड) माहिती तंत्रज्ञान अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल करुन गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन सायबर अमरावती ग्रामीण यांचेकडे देण्यात येवून तात्काळ मार्गदर्शनात तांत्रीक विश्लेषन करुन आरोपी अटक करुन पुरावे संकलीत करण्यासाठी ०३ पोलीस पथक तयार करण्यात आले.

मजूर वर्ग व गरीब इसम यांना किरकोळ स्वरुपाचा नगदी मोबदला देवून बैंक खाते उघडून त्यासोबत पासबुक, ए.टी.एम. कार्ड, नविन मोबाईल नंबर प्राप्त करुन आधार लिंक करुन त्या खात्यांचा अनाधिकृत ऑनलाईन गेमींगसाठी देशांतर्गत व देशाबाहेर करण्यासाठी वापर करण्यात येतो. नमुद खात्यामध्ये करोडो रूपयांचे आर्थिक व्यवहार होतात.

गुन्हयाचे तांत्रीक विश्लेषन केले असता तसेच मिळालेल्या गोपनिय माहितीच्या आधारे गोवा राज्यामध्ये दक्षिण गोवा या भागातील उच्चभ्रू प्रोव्हीडंट अडोरा सोसायटी या ठिकाणी पोलीस निरीक्षक विलासकुमार सानप व पोलीस अंमलदार प्रविण वानखडे, प्रविण अंबाडकर यांनी तांत्रीक माहितीचे आधारे रेड करुन खालील आरोपीतांना अटक करुन त्यांचेकडुन खालील मुद्देमाल जप्त केला. देवचंद बंडूजी मेश्राम वय २६ वर्ष रा अमरावती जि. जामडोल, प्रेम दिलीप खिलारे मुंबई, रार्थ नगरसिध्दा हिंगोली, हसाईराम चाळ. मु., नालासोपारा, अनिकेत सुरेश मस्के रा. कासमपूर., पथ्रोट,योगेश भिमरावजी ईरपाते वय ३१ वर्ष रा तिवसा जहागीरपुर बोर्डा, प्रितम ज्ञानेश्वर इंगळे वय २२ वर्ष रा अमरावती मोर्शी जि. मंगरुळ भिलापूर, आशिषकुमार उमाशंकर चौरसिया वय २५ वर्ष रा अमेठी मुसाफीर खाना जि. मंजेरीया, उत्तरप्रदेश , सत्यम गयाप्रसाद मौर्या वय २२ वर्ष रा- अमेठी राज्य मुसाफीर खाना जि. उत्तरप्रदेश, ,शुभम गयाप्रसाद झारीया वय ३० वर्ष, रा.बडा पथ्थ, जबलपूर, , वैभव कामराज सुर्यवंशी वय २४ र्ष रा- हौशंगाबाद मध्यप्रदेश, ,आदित्य युवराज माळी वय २७ वर्ष राफुटाताल बढाई मोहल्ला, जबलपूर, मध्यप्रदेश ,सुशिल इंदल बर्मन वय २८ वर्ष राल लाईनसिव्ही पावर हाउस जबलपूर, मध्यप्रदेश आदी आरोपी यांना अटक करण्यात आली आहे. आता पर्यंतच्या तपासामध्ये एकुण ०६,२५,००,०००/- रुपयाचे आर्थिक व्यवहार झाल्याचे उघड झाले असुन अधिक तपास सुरु आहे., नमुद गुन्ह्याचे तपासामध्ये एकुण ६४ बैंक खाते मिळून आले असुन सर्व खाते फ्रिज करण्यात आले. , नमूद बैंक खात्याचे अनुषंगाने तपास केला असता त्यामध्ये वेगवेगळ्या राज्यामध्ये ऑनलाईन तक्रारी दाखल आहेत., नमूद गुन्ह्यामध्ये राकेशकुमार झामनानी रा. अमरावती व इतर ०२ आरोपी फरार असुन शोध घेण्यात येत आहे .

**आरोपीतांचे ताब्यातून मिळून आलेला मुद्देमाल :-**

| | |
|---|---|
| विवीध बैंकेचे पासबुक | ६४ |
| विविध बैंकेचे ATM कार्ड | १४७ |
| विविध बैंकेच चेकबुक | १९ |
| सिमकार्ड | १९८ |
| मोबाईल हँडसेट | ५२ |
| लॅपटॉप | ९ |
| टॅबलेट | ३ |

**असा एकुण १०,८५,०००/-** मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**सर्वसामान्य जनतेला आवाहन:-**

गरीब व मजूर वर्गातील लोकांनी किरकोळ स्वरुपाच्या मोबदल्यासाठी गुन्हेगारांच्या प्रलोभनाला बळी न पडता आपले नावावरील बैंक खाते, ऊश कार्ड, आधारकार्ड, मोबाईल नंबर स्वताहाचे नावावर घेवून देउ नये. त्याचबरोबर अनोळखी व्यक्तींनी ध्ऊइ मागीतल्यास देउ नये.

या बैंक खात्यांचा वापर मोठ्या प्रमाणात ऑनलाईन गेमींग, शेअर मार्केट ट्रेडींग, डिजीटल अरेस्ट अशा प्रकारच्या सायबर गुन्ह्यामध्ये वापर होवून रक्कम माठ्या प्रमाणात ट्रान्सफर होते. या होणा-या गुन्ह्यापासुन आपण स्वतहाला सावध ठेवावे.

या दाखल गुन्ह्याचे अनुषंगाने अमरावती ग्रामीण जिल्हा व इतर ठिकाणी कोणीही आपले स्वतहाचे नावाचे बैंक खाते इतर कोणालाही वापरण्यास दिले असतील ते तात्काळ परत घ्यावे व अशा व्यक्तीचे नावे पो. स्टे. सायबर अमरावती हेल्पलाईन क्रमांक ७०३०००६८१९ यावर माहिती देण्यात यावी. असे आव्हाने यावेळी करण्यात आले आहे.

## प्रकाशकांनी ३० जून पर्यंत वार्षिक विवरणपत्र दाखल करावे

**वाशीम :** प्रेस आणि नियतकालिक नोंदणी अधिनियम, २०२३ अंतर्गत नोंदणीकृत प्रत्येक नियतकालिकाने आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षित वार्षिक विवरणपत्र प्रेस सेवा पोर्टल (इएइ) वर ऑनलाइन सादर करणे बंधनकारक आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ चे विवरणपत्र सादर न करणाऱ्या प्रकाशकांना ३० जून २०२६ पर्यंतची अखेरची संधी देण्यात आली आहे. यानंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नसल्याचे भारत सरकारच्या प्रेस रजिस्टर जनरल, नवी दिल्ली यांनी सूचनांद्वारे कळविले आहे.प्रेस आणि नियतकालिक नोंदणी अधिनियम, २०२३ मधील कलम १४(१)(ब) व १४(३) नुसार, वार्षिक विवरणपत्र निर्धारित मुदतीत न भरल्यास संबंधित प्रकाशकावर दंड आकारण्याची तरतूद आहे. पहिल्या चुकीसाठी किमान दहा हजार रुपयांचा दंड आकारला जाईल. त्यानंतरच्या प्रत्येक चुकीसाठी दंडाची रक्कम मागील दंडाच्या दुप्पट असेल. मात्र, एकूण दंडाची कमाल मर्यादा दोन लाख रुपये निश्चित करण्यात आली असल्याचे प्रेस रजिस्टार जनरल, नवी दिल्ली यांनी दिलेल्या सूचनांमध्ये नमूद केले आहे.

# देणं चौदा हजार, दाखवला लाखांचा बाजार!

## *विठ्ठल ग्रामीण सहकारी पतसंस्थेचा भोंगळ कारभार *ई-हक्क प्रणालीच्या गैरवापराचा शेतकऱ्याचा गंभीर आरोप

**प्रभाकर नाईकवाडे @रिसोड**

केवळ १४,७६६ इतकी थकबाकी असताना तब्बल ६.८० लाखांचा बोजा शेतजमिनीवर चढविण्याचा प्रयत्न, तसेच ई-हक्क प्रणालीमध्ये शेतकऱ्याच्या संमतीशिवाय फेरफार अर्ज दाखल केल्याचा गंभीर आरोप समोर आल्याने केनवड परिसरात एकच खळबळ उडाली आहे. रिसोड तालुक्यातील केनवड येथील शेतकरी गोपाल भिमराव वानखेडे यांनी विठ्ठल ग्रामीण सहकारी पतसंस्थेविरोधात लेखी तक्रार दाखल करत हा गंभीर दावा केला आहे. विशेष म्हणजे, या प्रकरणी शिरपूर जैन पोलीस ठाण्यात तक्रार देऊनही अद्याप कोणतीही ठोस चौकशी सुरू झालेली नसल्याचा आरोप करण्यात आला असून, त्यामुळे सहकार आणि महसूल व्यवस्थेच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. प्रत्यक्ष थकबाकी आणि दाखविण्यात आलेल्या देयक रकमेतील प्रचंड तफावत नेमकी कशी निर्माण झाली, ई-हक्क प्रणालीतील अर्ज कोणाच्या आधारे दाखल झाला आणि यामागील सत्य काय, याची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

तक्रारदार गोपाल वानखेडे यांच्या म्हणण्यानुसार, त्यांनी सन २०१८ मध्ये संबंधित पतसंस्थेकडून १ लाख ५० हजारांचे वैयक्तिक कर्ज घेतले होते. काही कौटुंबिक व वैद्यकीय कारणांमुळे सुरुवातीला कर्जफेडीत अडचणी निर्माण झाल्या. मात्र त्यानंतर त्यांनी नियमितपणे कर्जाची परतफेड सुरू केली. दरम्यान, पतसंस्थेने सन २०२२ मध्ये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाच्या कलम १०१ अंतर्गत वसुलीचा दावा दाखल केला. तक्रारीनुसार, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था कार्यालयाने दिनांक २५ जानेवारी २०२३ रोजी २,७८,३८० इतक्या रकमेच्या वसुलीसाठी दाखला दिला होता. त्यानंतर २० नोव्हेंबर २०२३ ते ५ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत वानखेडे यांनी एकूण ?२,८३,००० इतकी रक्कम पतसंस्थेकडे जमा केल्याचा दावा केला आहे. त्यामुळे वसुली दाखल्यातील संपूर्ण रक्कम भरूनही अधिक रक्कम जमा झाल्याचे त्यांनी नमूद केले आहे. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, संबंधित पतसंस्थेच्या खातेउताऱ्यात त्यांच्या खात्यावर केवळ ?१४,७६६ इतकीच थकबाकी शिल्लक असल्याचे नमूद आहे. ही रक्कम भरण्याची तयारी त्यांनी दर्शविली असतानाही ती स्वीकारण्यात आली नसल्याचा आरोप आहे. उलट त्यांच्या मालकीच्या गट क्रमांक ५७२ मधील शेतजमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर ६.८० लाखांचा बोजा चढविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आल्याचे त्यांनी म्हटले आहे. या प्रकरणातील आणखी गंभीर बाब म्हणजे मार्च २०२६ मध्ये ई-हक्क प्रणालीमध्ये त्यांच्या नावाचा वापर करून त्यांच्या संमतीशिवाय फेरफार अर्ज सादर करण्यात आल्याचा दावा. संबंधित अर्जामध्ये ६.८० लाखांचा बोजा दाखविण्यात आला असून, त्यासाठी वापरण्यात आलेल्या कागदपत्रांच्या वैधतेबाबतही शंका उपस्थित करण्यात आली आहे. त्यामुळे महसूल विभागाच्या ऑनलाइन प्रणालीचा गैरवापर झाला आहे का, असा प्रश्न निर्माण झाला आहे. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, प्रत्यक्ष थकबाकी अत्यल्प असताना लाखो रुपयांची देयक रक्कम दाखविल्यामुळे त्यांच्यावर मोठा मानसिक, आर्थिक आणि सामाजिक ताण निर्माण झाला आहे. 'ज्या रकमेची थकबाकी नाही, त्या रकमेचा बोजा दाखवून जमीन धोक्यात आणली जात असेल तर सामान्य शेतकऱ्याने न्याय कुठे मागायचा?' असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. दरम्यान, या प्रकरणाबाबत शिरपूर जैन पोलीस ठाण्यात लेखी तक्रार देण्यात आली असल्याचे तक्रारदाराने सांगितले आहे. मात्र तक्रार दाखल करून बराच कालावधी उलटूनही कोणतीही प्राथमिक चौकशी, जबाब नोंदणी किंवा कागदपत्रांची पडताळणी करण्यात आलेली नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. त्यामुळे संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष व पारदर्शक चौकशी करून सत्य समोर आणण्याची मागणी करण्यात येत आहे.




> गोपाल वानखेडे प्रकरणाबाबत विठ्ठल ग्रामीण पतसंस्थेच्या शाखा अधिकाऱ्यांशी संपर्क साधून त्यांची भूमिका जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, 'या विषयाची मला माहिती नसून याबाबत वरिष्ठ अधिकारीच अधिकृत माहिती देऊ शकतील,' असे सांगत त्यांनी प्रतिक्रिया देण्यास नकार दिला.'
>
> **शरद राऊत** ,शाखा अधिकारी,
> विठ्ठल ग्रामीण पतसंस्था केनवड

स्थानिक नागरिकांनीही या प्रकरणाबाबत चिंता व्यक्त केली असून, संबंधित पतसंस्थेचे खातेउतारे, वसुली दाखले, ई-हक्क प्रणालीतील अर्ज, फेरफारासाठी सादर करण्यात आलेली कागदपत्रे आणि इतर नोंदींची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. केवळ १४,७६६ इतकी थकबाकी असताना ?६.८० लाखांची मागणी कशी करण्यात आली, ई-हक्क प्रणालीतील अर्ज कोणाच्या आधारे दाखल झाला आणि पोलिसांकडे तक्रार दिल्यानंतरही चौकशी का सुरू झाली नाही, असे प्रश्न आता नागरिकांमधून उपस्थित केले जात आहेत.

मी विठ्ठल ग्रामीण सहकारी पतसंस्थेकडून घेतलेल्या ?१.५० लाख कर्जाची परतफेड करताना आजपर्यंत मूळ कर्जापेक्षा कितीतरी अधिक रक्कम भरली आहे. निबंधक कार्यालयाच्या आदेशानुसार २.८३ लाखांची रक्कमही जमा केली. तरीही माझ्याकडे केवळ ?१४,७६६ थकबाकी असताना ती रक्कम स्वीकारण्याऐवजी माझ्या शेतीवर तब्बल ६.८० लाखांचा बोजा चढविण्याचा प्रयत्न करण्यात आला. हा प्रकार अत्यंत धक्कादायक असून माझ्यावर आर्थिक आणि मानसिक अन्याय करणारा आहे.

> माझ्या संमतीशिवाय ई-हक्क प्रणालीचा वापर करून दस्तऐवज सादर करण्यात आले. त्यामुळे संपूर्ण प्रक्रियेबाबत गंभीर शंका निर्माण झाली आहे. एक शेतकरी म्हणून मी न्यायासाठी सर्व संबंधित कार्यालयांचे दरवाजे ठोठावत आहे, परंतु अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे व दोषींवर कठोर कारवाई करावी, हीच माझी प्रशासनाकडे अपेक्षा आहे. अन्यथा सर्वसामान्य शेतकऱ्यांचा सहकारी संस्थांवरील विश्वास उडण्याची भीती आहे.'
>
> **गोपाल भिमराव वानखेडे,**
> शेतकरी, केनवड

## थोडक्यात

### केनवड परिसरात मुसळधार पावसाने दिलासा

**मांगुळझनक परिसरातील नाल्यांना पूर, काही काळ वाहतूक ठप्प**



**सिटी न्युज ब्युरो @केनवड**

शेतकरी आतुरतेने वाट पाहत असलेल्या पावसाने अखेर काल दमदार हजेरी लावत केनवड परिसराला मोठा दिलासा दिला. सायंकाळी झालेल्या मुसळधार पावसामुळे शेतशिवारात पाणी साचले असून खरीप हंगामातील पेरणीच्या कामांना गती मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.

केनवडसह मांगुळझनक परिसरात जोरदार पाऊस झाल्याने लहान-मोठ्या नाल्यांना पूर आला. पाण्याचा प्रवाह वाढल्यामुळे काही ठिकाणी रस्त्यावरून पाणी वाहू लागले आणि खबरदारीचा उपाय म्हणून काही काळ वाहतूक ठप्प झाली होती. पूर ओसरल्यानंतर वाहतूक पूर्ववत सुरू करण्यात आली.दरम्यान, यापूर्वी कमी पावसामुळे चिंतेत असलेल्या शेतकऱ्यांना या पावसाने मोठा दिलासा मिळाला आहे. विशेषतः शेतामध्ये लावलेल्या हळद पिकाला या पावसामुळे जिवदान मिळाल्याची भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली. तसेच मातीमध्ये पुरेसा ओलावा निर्माण झाल्याने सोयाबीन, तूर, उडीद, मूग आदी खरीप पिकांच्या पेरणीला वेग येणार असल्याचे चित्र आहे.

### कारंजा न.प.येथे 'एकल महिला दिन' साजरा



**सिटी न्युज ब्युरो @केनवड**

दिनांक २३ जून २०२६ रोजी मा.अध्यक्षा नगरपरिषद कारंजा मा.फरीदाबानू मोहम्मद शफी पुंजानी,मा.उपाध्यक्ष फिरोज शेकूवाले,मा.मुख्याधिकारी महेश वाघमोडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली नगरपरिषद कारंजा येथे 'एकल महिला दिन' कार्यक्रम आयोजित करण्यात आला. सदर कार्यक्रमास महिला व बालकल्याण सभापती शाहीन सुभान खेतीवाले, उपमुख्याधिकारी जितेंद्र पटले ,महिला व बालकल्याण समिती सदस्य, राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान कक्षाचे शहर अभियान व्यवस्थापक संघरत्न नरवाडे,समुदाय संघटक रूपाली साखरकर, राजू मनवर,अंगणवाडी सेविका व कारंजा शहरातील एकल महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.त्यानंतर उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपमुख्याधिकारी जितेंद्र पटले सरांनी केले.ज्यामध्ये त्यांनी सांगितले की,आंतरराष्ट्रीय एकल महिला दिनाच्या निमित्ताने एकल महिलांच्या समस्या जाणून घेऊन त्यांना विविध शासकीय योजनांची माहिती देणे हा असून नगरपरिषदे मधील ऌळथ्श विभाग हा एकल महिला करिता मार्गदर्शन कक्ष म्हणून कार्यरत राहणार असल्याबाबत सांगितले आहे.त्यानंतर शहर अभियान व्यवस्थापक यांनी शासनाच्या विविध योजना बद्दल माहिती सांगितली.काही कर्तुत्वान एकल महिलांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.यावेळी बहुसंख्य महिला उपस्थित होत्या,कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन राजू मनवर यांनी मानले.

## सिटी न्यूज सुपरफास्टची भविष्यवाणी ठरली खरी; पोलीस असल्याची बतावणी करून केली सोन्याची चोरी!

**सिटी न्युज ब्युरो @रिसोड**


मंगळवार दि ९ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

नागरिकांना आवाहन, चोरांपासून रहा सावधान!

जागृत राहा सतर्क राहा-

आम्ही पोलीस म्हणून करतात वार नागरिकांना सतर्क रहा वारंवार...

**सिटी न्यूज सुपरफास्टचे पुन्हा एकदा नागरिकांना आवाहन**

'आम्ही पोलीस आहोत' असे सांगत नागरिकांना लक्ष्य करणाऱ्या भामट्यांपासून सावध राहा, असा इशारा सिटी न्यूज सुपरफास्टने दिनांक ९ जून २०२६ रोजी 'आम्ही पोलीस म्हणून करतात वार, नागरिकांनी सतर्क राहा' या ठळक मथळ्याखाली दिला होता. त्याचबरोबर रिसोड पोलिसांनीही नागरिकांना सावध राहण्याचे आवाहन केले होते. मात्र, या इशाऱ्यानंतर अवघ्या काही दिवसांतच तो तंतोतंत खरा ठरला असून २० जून रोजी सायंकाळी खंडेलवाल कॉम्प्लेक्स परिसरात पोलीस असल्याची बतावणी करून एका ६५ वर्षीय महिलेच्या अंगावरील सोन्याचे दागिने लंपास करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.

प्राप्त माहितीनुसार, भाग्यश्री लक्ष्मण झुंजारे (वय ६५) या नणंदेच्या घरी जात असताना खंडेलवाल कॉम्प्लेक्स परिसरात दोन अनोळखी इसमांनी त्यांना अडवले. 'पोलिसांची तपासणी सुरू आहे. गळ्यातील सोन्या-चांदीचे दागिने घालून फिरू नका, ते सुरक्षितपणे थैलीमध्ये ठेवा,' अशी भुलथाप त्यांनी दिली.त्या दोघांच्या बोलण्यावर विश्वास ठेवून भाग्यश्री झुंजारे यांनी गळ्यातील दोन सोन्याचे डोरले व एक ग्रॅमचे मनी असे सुमारे १५ हजार रुपये किमतीचे दागिने काढले. सुरुवातीला त्या दागिने ब्लाऊजमध्ये ठेवत असताना, 'असे ठेवू नका, आमच्या थैलीमध्ये ठेवा, आम्ही सुरक्षित ठेवतो,' असे सांगून आरोपींनी स्वतःजवळील थैली पुढे केली.महिलेने दागिने त्यांच्या हाती दिल्यानंतर आरोपींनी हातचलाखीने दागिने गायब केले आणि थैली परत दिली. काही अंतर पुढे गेल्यानंतर थैली तपासली असता त्यामध्ये दागिने नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. तोपर्यंत दोन्ही भामटे घटनास्थळावरून पसार झाले होते.

या प्रकरणी भाग्यश्री लक्ष्मण झुंजारे यांच्या फिर्यादीवरून रिसोड पोलिसांनी अज्ञात दोन इसमांविरुद्ध फसवणूक व चोरीचा गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.विशेष म्हणजे, यापूर्वीही अशाच प्रकारे स्वतःला पोलीस असल्याचे सांगून नागरिकांची फसवणूक करणाऱ्या टोळ्यांच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये, विशेषतः महिलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. कोणतीही व्यक्ती स्वतःला पोलीस असल्याचे सांगत अंगावरील दागिने किंवा मौल्यवान वस्तू काढण्यास सांगत असेल, तर त्यावर त्वरित विश्वास ठेवू नका. संबंधित व्यक्तीचे ओळखपत्र तपासा आणि संशयास्पद हालचाल दिसताच तात्काळ पोलिसांना माहिती द्या. थोडीशी सावधगिरी मोठे आर्थिक नुकसान टाळू शकते.

## लोकसहभागातून पाणंद रस्त्याला प्रारंभ

### लोणी बुद्रुकचा आदर्श उपक्रम...

**सिटी न्युज ब्युरो @वाशीम**

रिसोड तालुक्यातील श्रीक्षेत्र लोणी बुद्रुक येथील लोणी बुद्रुक–मोप शेत पाणंद रस्ता अनेक वर्षांपासून बंद असल्याने शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. शासनाच्या निधीची वाट न पाहता ग्रामस्थांनी लोकवर्गणीच्या माध्यमातून पुढाकार घेत जेसीबीच्या सहाय्याने रस्त्याच्या कामाला सुरुवात केली.

रस्त्याचे उद्घाटन तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांच्या हस्ते कल्याण महाराज जोशी यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी मंडळाधिकारी जाधव, तलाठी पी. के. निरफळे, सरपंच, तंटामुक्ती अध्यक्ष तसेच सुनील बोडखे, प्रदीप पाटील आणि गणेश बोडखे उपस्थित होते.माजी सैनिक उत्तम बोडखे यांच्या पुढाकारातून शेतकऱ्यांनी एकत्र येत सुमारे एक ते दीड किलोमीटरचा पाणंद रस्ता तयार करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे यंदाच्या खरीप हंगामात शेतात जाणे, मशागत करणे व शेतीची वाहतूक सुलभ होणार आहे. तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी हा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे सांगत, शेत रस्त्यांच्या प्रश्नावर वाद न करता सामंजस्याने मार्ग काढण्याचे आवाहन केले. तर सुनील बोडखे यांनी सर्व शेतकऱ्यांच्या सहकार्यामुळे अनेक वर्षांचा प्रश्न मार्गी लागल्याचे सांगितले. 'गाव करी ते राव न करी' या म्हणीप्रमाणे लोणी बुद्रुकच्या ग्रामस्थांनी लोकसहभागातून विकासाचा आदर्श निर्माण केला असून हा उपक्रम इतर गावांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे.

## एकल महिलांच्या सक्षमीकरणासाठी जिल्हास्तरीय बैठकीत मंथन

**व्यापक व लोकाभिमुख धोरण निर्मितीसाठी विविध घटकांचा सहभाग**

**सिटी न्युज ब्युरो @ वाशीम**

विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता, अविवाहित तसेच इतर एकल महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी महाराष्ट्र शासनामार्फत स्वतंत्र आणि व्यापक एकल महिला धोरण तयार करण्यात येत आहे. या धोरणाच्या निर्मिती प्रक्रियेत स्थानिक स्तरावरील सूचना, अनुभव आणि अपेक्षांचा समावेश व्हावा या उद्देशाने जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाच्या वतीने सोमवार, दि. २२ जून २०२६ रोजी जिल्हा परिषद वाशिम येथील सभागृहात जिल्हास्तरीय बैठक आयोजित करण्यात आली.



आयुक्त, महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे, जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांच्या मार्गदर्शनानुसार आयोजित या बैठकीत एकल महिलांच्या विविध प्रश्नांवर सखोल चर्चा करण्यात आली. तसेच संबंधित कायदे व नियमांमध्ये सुधारणा करण्याबाबत अभ्यासपूर्ण मते मांडण्यात आली. आशा स्वयंसेविका, पर्यवेक्षिका आणि जिल्ह्यातील विविध गावांतील एकल महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## मुंबई येथील राज्यव्यापी आंदोलनास उपस्थित रहावे -प्रा.संतोष वाघ

**सिटी न्युज ब्युरो @ कारंजा**

जिल्ह्यातील सर्व अंशतः बंधु आणि भगिनींना कळविण्यात येते की,अंशतः अनुदानित शाळांतील टप्पा वाढ व प्रलंबित मागण्यांसाठी दिनांक २२ जून २०२६ पासून मुंबई आझाद मैदान येथे समन्वय संघाच्या वतीने राज्यव्यापी आंदोलन आयोजित करण्यात आले आहे.

या आंदोलनाच्या अनुषंगाने पुढील दिशा,नियोजन व अकोला जिल्ह्यातील सहभागाबाबत चर्चा करण्यासाठी जिल्हास्तरीय बैठकीचे आयोजन दिनांक १९/६/२६ रोजी बि.आर.हायस्कूल अकोला येथे करण्यात आले होते.या बैठकीत शेकडो प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक अंशतः अनुदानित शिक्षक बंधू भगिनी उपस्थित होते.



यावेळी अनेक मुद्द्यावर सखोल चर्चा करण्यात आली.त्रुटी पूर्तता केलेल्या शाळांना समान टप्पा व टप्पा वाढ ते पेन्शन व वैद्यकीय योजना इत्यादी गोष्टीवर महत्त्वपूर्ण चर्चा झाली त्याचबरोबर विकास पागृत, प्रा.संतोष वाघ,बाळकृष्ण गावंडे, असीमोद्दीन सर, प्रा.विजय थोटांगे, प्रा.तौफिक खान,प्रा.श्रीधर भदे यांची मनोगत झाली यावेळी शिक्षक समन्वयक उपेंद्र बाबाराव पाटील यांनी आपले मनोगतातून मुंबई येथे होऊ घातलेल्या पावसाळी अधिवेशनात आपला प्रश्न कसा मार्गी लावायचा याबाबत मार्गदर्शन केले.आणि सर्व अंशतः अनुदानित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी बंधू भगिनींना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले.शासन जोपर्यंत आपले काम करत नाही म्हणजे प्रचलीत धोरणानुसार टप्पा वाढ करत नाही तोपर्यंत आजाद मैदान मुंबई येथून हलायचे नाही अशा प्रकारे सर्वानुमते चंग बांधण्यात आला.यावेळी देवेंद्र जपसरे ,प्रा.प्रवीण धाडसे, आनंदा डोंगरे, सोहेल खान, विलास घोगरे,योगेश सुसनकर, जमिला फातिमा,जावेद खान,अब्दुल अहमद,गणेश गिऱ्हे,श्रीकांत पाटील, कु.कल्पनाहुरपडे,कु.पी.पी.पागृत,प्रा.डी एस. नवघरे, एस.एच.बालदे उपस्थित होते. तरी अंशतः अनुदानित क्षेत्रातील सर्व संघटनांचे राज्य पदाधिकारी, विभाग पदाधिकारी जिल्हाध्यक्ष, जिल्हा उपाध्यक्ष, तालुकाध्यक्ष,शहराध्यक्ष व प्रमुख पदाधिकारी व इतर सर्व कर्मचाऱ्यांनी आझाद मैदान येथे आवर्जून उपस्थित राहावे.तसेच सर्व अंशतः अनुदानित प्राथमिक,मध्यामिक व उच्च माध्यमिक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी बंधू आणि भगिनींनी बहुसंख्येने मुंबई आझाद मैदान येथे दिनांक २२ जून पासून आपल्या मागण्या पूर्ण होईपर्यंत विदर्भातील सर्व अंशतः अनुदानित शिक्षकांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे असे शिक्षक समन्वय संघाच्या वतीने प्रा.संतोष वाघ,उपेंद्र बाबाराव पाटील यांनी केले आहे.

### सिटी न्युज सुरपफास्टच्या वृत्ताची दखल...

## अन्न व औषध प्रशासन कारवाईसाठी दाखल!

**कारंजा शहरात हॉटेलवर कारवाई *दूध डेअरी वरील नमुने तपासण्यासाठी ताब्यात**

**सिटी न्युज ब्युरो @कारंजा**

कारंजा शहरांमध्ये हॉटेल्स, उपहारगृह, दूध डेअरी व खाद्य तेलामध्ये मोठ्या प्रमाणावर भेसळ होत असून त्याची मोठ्या प्रमाणावर विक्री होत आहे.त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.या अनुषंगाने कारंजा शहरामध्ये अन्न व औषध प्रशासन विभागाने धाड टाकून दोन हॉटेल वर कारवाई करून व तीन दूध डेअरी मधून पदार्थाचे नमुने तपासणीसाठी ताब्यात घेतले आहे.


६ रविवार दि १४ जून २०२६ सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम वाशीम Express

कारंजा येथे भेसळयुक्त पदार्थांची उपाहारगृह, हॉटेल व डेअरी मध्ये मोठ्या प्रमाणावर विक्री!

*परराज्यातून आलेले करत आहेत भेसळयुक्त पदार्थांची विक्री

*अधिकारी हप्ते घेऊन गप्प *सर्वसामान्य नागरिकांचे आरोग्य धोक्यात

सविस्तर माहिती अशी कि,कारंजा शहर शिक्षणाचे माहेरघर असून,एक मोठी व्यावसायिक बाजारपेठ आहे.त्यामुळे येथे मोठे हॉटेल,उपाहारगृह,दूध डेअरी किराणा दुकानांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे भेसळयुक्त पदार्थांची विक्री होणे सहाजिक आहे.

आणि यामुळे सर्वसामान्य नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत असल्यामुळे आमचे सिटी न्यूज सुपरफास्ट चे प्रतिनिधी किरण क्षार यांनी अन्न व औषध प्रशासन विभागाशी संपर्क केला असता अन्न व प्रशासन विभागाची टीम शहरात दाखल झाली व त्यांनी तपास केला असता गुप्ता स्वीट व पापाजी या दोन हॉटेलवर नाश्ता देण्यासाठी न्युज पेपर चा वापर केल्यामुळे कारवाई केली तसेच पाटील दूध डेअरी, कामधेनु दूध डेअरी व काठीयावाड दूध डेअरी मधील पदार्थाचे नमुने तपासणीसाठी ताब्यात घेतले.यार नमुन्यामध्ये काही भेसळयुक्त पदार्थ आढळल्यास यावर कारवाई होईल असे अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. परंतु ही कारवाई अतिशय संक्षिप्त झाली असून बऱ्याच हॉटेल,किराणा दुकान, उपहारगृह वर कारवाई होणे अपेक्षित होते.त्यामुळे ही कारवाई फक्त देखावा होता का अशी सर्वसामान्य जनतेमध्ये चर्चा आहे.

## ग्रामपंचायत साखरडोह येथे जागतिक योगदीन कार्यक्रम

**सिटी न्युज ब्युरो @वाशीम**

ग्रा.पं. साखरडोह व जिल्हा परिषद केंद्रीय शाळा साखरडोह यांच्या संयुक्त विद्यमाने सकाळी ठीक सात वा. जिल्हा परिषद शाळा साखरडोह येथे जागतिक योग दिनानिमित्त योग प्राणायाम यांचा कार्यक्रम संपन्न झाला. योग शिक्षक तथा ग्रामपंचायत अधिकारी सुरेश गावंडे पाटिल यांनी शालेय विद्यार्थ्यांना, शिक्षक, अंगणवाडी सेविका व उपस्थित ग्रामस्थ यांना योगाचे महत्व व योग प्राणायाम विषयी मार्गदर्शन केले.गावातील सर्व विद्यार्थ्यांसह नागरिकांनी या कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शविली, या कार्यक्रमाला शाळेचे मुख्याध्यापक विजय पवार सर,ठाकरे सर, गवई मॅडम,साबळे मॅडम यांच्यासह अंगणवाडी सेविका केंद्र १व २ शारदा इंगोले, बेबी भोयर आशा कांताबाई



देवराव इंगोले उपस्थित होत्या. सूत्रसंचालन तथा आभार प्रदर्शन प्रभारी केंद्रप्रमुख तथा मुख्याध्यापक विजय पवार सर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरता ग्रामपंचायतचे शिपाई उमेश रामभाऊ चव्हाण यांनी अथक परिश्रम घेतले . ३० जून ला शाळा सुरू झाल्यानंतर दर शनिवारी सकाळी सात ते आठ या वेळात विद्यार्थ्यांना योग प्राणायाम शिकविण्याचे आश्वासन ग्रामपंचायत अधिकारी सुरेश पाटील गावंडे यांनी दिले. त्यामुळे जिल्हा परिषद शाळा साखरडोह येथे दर शनिवारी योग व प्राणायाम शिकवल्या जानार म्हणून विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण दिसून आले.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
बुधवार, दि. २४ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# माजी सैनिकाची मागणी जिल्हाधिकाऱ्यांनी केली खारीज

प्रतिनिधी २४ जून

♦ भोगवटदार वर्ग २ ची जागा १ मध्ये रुपांतरीत करण्यास नकार




**मलकापुर :** शहरातील अब्दुल हमीद चौकातील नझूल शिट नंबर १५, भूखंड क्रमांक ३७७/३/२४ क्षेत्रफळ ७४.३४ चौ.मी हा शासकीय भुखंड माजी सैनिक शेख शकील शेख तामील यांना रहिवासी प्रयोजनार्थ शासनाने प्रदान केली होती.त्या जागेवर शासनाची पूर्वपरवानगी न घेता मो.शकील यांनी अतिक्रमण वाढवून दुमजली इमारत बांधून वाणिज्य प्रयोजनासाठी दुकाने बांधली व आता तो भुखंड भोगवटदार वर्ग-१ मध्ये रूपांतरित करण्याचा अर्ज मो.शकील मो.कामील यांनी जिल्हाधिकाऱ्यांनी किरण पाटील यांच्या कडे दाखल केला होता.मात्र जिल्हाधिकाऱ्यांनी सदर अर्ज खारीज केल्याची माहिती माहिती अधिकारात नुर अकदस शेख जमील यांना दि. ०३ जुन २६ रोजी मिळाली आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, मलकापूर शहरातील नझुल सीट नंबर १५ भूखंड क्रमांक ३७७/३/२४ क्षेत्रफळ ७४.३४ चौ.मी ही जागा रहिवासी प्रयोजनार्थ शासनाने प्रदान केली असून सदर जागेवर पूर्वपरवानगी न घेता मोहम्मद शकील मोहम्मद कामील दुमजली इमारत,दुकाने बांधून वाणिज्य प्रयोजनासाठी वापर करण्यात येत असल्याने तपासणीमध्ये जमीन प्रधानाच्या अटी व शर्तीचा भंग झाल्याचे व अशा अटी व शर्तीचा भंग सक्षम प्राधिकार्याने नियमाकुल केलेला नसल्याचे निदर्शनास आले तसेच सबब विषयांकित भूखंड हा रहिवासी प्रयोजनार्थ प्रदान करण्यात आला असून सदर जागेचा वापर पूर्व परवानगी न घेता वाणिज्य प्रयोजनासाठी करण्यात येत असल्याने महाराष्ट्र जमीन महसूल (भोगवटदार वर्ग - २आणि भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या जमिनी भोगवटदार वर्ग-१ मध्ये रूपांतरीत करणे) नियम, २०२५' नुसार भोगवटदार वर्ग - १ मध्ये रूपांतरित करणे बाबतचा अर्ज मान्य करता येणार नाही. सदर अर्ज या द्वारे खारीज करण्यात येत असल्याचे जिल्हाधिकारी किरण पाटील पाटील जिल्हाधिकारी यांनी दि. १४ जानेवारी २०२५ रोजी आदेश केला आहे. तसेच उपविभागीय अधिकारी मलकापूर यांना माहिती तथा आवश्यक त्या कारवाईसाठी अर्जदार यांनी सदर भूखंड वाटप आदेशातील अटी व शर्थीचा भंग केल्या असल्याने प्रचलित धोरणानुसार संबंधिताविरुद्ध कारवाई करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी यांनी उपविभागीय अधिकारी संतोष शिंदे यांना दिल्या असल्याचेही पत्रात नमूद केले आहे.

# वन्य प्राण्यांचा उपद्रव वाढला; कपाशी उत्पादक शेतकरी हैराण!

प्रतिनिधी २४ जून



**खामगाव**

तालुक्यात यंदा मान्सून पूर्व कपाशी लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या वाढली असली, तरी वन्यप्राण्यांच्या वाढत्या उपद्रवामुळे शेतकरी चिंतेत सापडले आहेत. विशेषतः रानडुक्कर व इतर वन्य प्राण्यां कडून पिकांचे नुकसान होत असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसण्याची भीती निर्माण झाली आहे.

यंदा अनेक शेतकऱ्यांनी पावसाळ्यापूर्वीच कपाशीची लागवड केली आहे. मात्र, प्रारंभीच्या टप्प्यातील कोवळी रोपे वन्य प्राण्यां कडून उद्ध्वस्त केली जात असल्याच्या तक्रारी विविध भागांतून पुढे येत आहेत. रात्रीच्या वेळी रान डुकरांचे कळप शेतात घुसून पिकांची नासधूस करीत असल्याने शेतकऱ्यांचे नुकसान वाढत आहे.

वन्यप्राण्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे पिकांचे संरक्षण करण्यासाठी अनेकांना रात्री शेतातच मुक्काम करून जागरण कराते लागत आहे.

काही ठिकाणी शेतकरी फटाके, प्रकाशयंत्रे तसेच इतर उपायांचा वापर करून जनावरांना हुसकावून लावण्याचा प्रयत्न करीत आहेत. मात्र, त्याचा अपेक्षित परिणाम होत नसल्याचे सांगितले जात आहे. वन्य प्राण्यां पासून कपाशी चा बचाव करताना शेतकऱ्यांची चांगलीच दमछाक होत आहे.

वन्यप्राण्यांच्या वाढत्या उपद्रवामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याचे दिसून येत आहे.वनविभाग व संबंधित प्रशासनाने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन रानडुकरां सह अन्य वन्य प्राण्यांच्या उपद्रवा वर नियंत्रण मिळविण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे. पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने पंचनामे करून योग्य मदत व भरपाई देण्यात यावी, अशी अपेक्षाही शेतकरी वर्गातून व्यक्त केली जात आहे. जेणेकरून शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यास मदत होईल.

**शेतकरी दुहेरी संकटात !**

एकीकडे शेतीचा उत्पादन खर्च सातत्याने वाढत असताना, दुसरीकडे वन्यप्राण्यां कडून पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दुहेरी आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे.

# अतिक्रमण निर्मूलन कारवाईचा फायदा काय? परिस्थिती 'जैसे थे'!

♦ खामगाव शहरात रस्त्यावर पुन्हा अतिक्रमण !

प्रतिनिधी २४ जून

**खामगाव :** शहरातील वाहतूक सुरळीत करण्यासाठी आणि नागरिकांना रस्ते मोकळे करून देण्याच्या उद्देशाने नगरपालिका प्रशासनाने सात दिवसांपूर्वी मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण हटाओ मोहीम राबविली होती. या मोहिमेत बसस्थानक ते जी. एस. कॉलेज या शहरातील अत्यंत वर्दळीच्या मार्गावरील अतिक्रमणे हटवून रस्ता मोकळा केला होता; मात्र अवघ्या सात दिवसात रस्त्यावर पुन्हा अतिक्रमण वाढल्याचे दिसून येत आहे.

नगरपालिकेच्या पथकाने केलेल्या कारवाईनंतर काही व्यापारी व फेरीविक्रेत्यांनी दुसऱ्याच दिवशी पुन्हा रस्त्याच्या कडेला साहित्य थाटल्याचे दिसून आले. त्यानंतर हळूहळू इतरांनीही पूर्वीप्रमाणे अतिक्रमणे करण्यास सुरुवात केली. परिणामी, बसस्थानक ते जी. एस. कॉलेज मार्गावर पुन्हा एकदा अतिक्रमणांचे जाळे निर्माण झाले असून, रस्त्याची रुंदी कमी झाल्याने वाहतुकीवर परिणाम होत आहे. या मार्गावर दररोज मोठ्या प्रमाणात वाहनांची आणि नागरिकांची वर्दळ असते. अतिक्रमणामुळे वाहनचालकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत असून, पादचाऱ्यांनाही अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे अपघातांचा धोका वाढल्याची शक्यता आहे. नगरपालिका प्रशासनाने पुन्हा अतिक्रमण हटाओ मोहीम राबविण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

**कारवाईनंतर देखरेख नाही!**

नगरपालिका प्रशासनाने अतिक्रमण हटविण्यासाठी मनुष्यबळ, यंत्रसामग्री आणि वेळ खर्च करून विशेष मोहीम राबविली होती. मात्र, त्यानंतर सातत्याने देखरेख आणि प्रभावी अंमलबजावणी न झाल्याने या कारवाईचा अपेक्षित परिणाम दिसून आलेला नाही. त्यामुळे केवळ एकदिवसीय कारवाई करून अतिक्रमणाचा प्रश्न सुटणार नसून, नियमितपणे मोहीम राबविण्याची आवश्यकता असल्याचे स्पष्ट होत आहे अवघ्या आठवडाभरात परिस्थिती पुन्हा पूर्ववत झाल्याने पालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन कारवाईचा नेमका फायदा काय, असा सवाल नागरिकां कडून उपस्थित केला जात आहे. शहरातील प्रमुख मार्ग कायमस्वरूपी अतिक्रमणमुक्त ठेवण्यासाठी प्रशासना ने प्रभावी आणि सातत्यपूर्ण उपाययोजना करा व्यात, अशी मागणी होत आहे.

जेणेकरून संभाव्य धोका टाळण्यास मदत होईल. अन्य अतिक्रमणांकडेही लक्ष देण्याची मागणी नांदुरा रोडवरील अतिक्रमणांवर कारवाई करताना शहरातील इतर प्रमुख मार्गावरील अतिक्रमणांकडे दुर्लक्ष का केले जात आहे, असा सवाल व्यावसायिकांकडून उपस्थित केला जात आहे.

# रेतीची अवैध वाहतूक ; ट्रॅक्टर, टिप्पर जप्त, तिघांविरोधात गुन्हा

प्रतिनिधी २४ जून

♦ हिवरखेड पोलिसांची कारवाई: १६ लाखांचा मुद्देमाल जप्त

**खामगाव :** रेतीच्या अवैध वाहतुकी विरोधात हिवरखेड पोलिसांनी धडक कारवाई करत, ट्रॅक्टर व टिप्पर अशी दोन वाहने रेती सह जप्त केली. या कारवाईत एकूण १६ लाख १६ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून, तिघांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

हिवरखेड पोलिस दि. २२ जून रोजी खामगाव-मेहकर मार्गावर गस्त घालत असताना टिप्पर क्रमांक एमएच २९ बीई ९२९५ मध्ये सुमारे तीन ब्रास रेती भरून विनारॉयल्टी वाहतूक केली जात असल्याचे आढळून आले. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत, टिप्पर ताब्यात घेतला. दरम्यान, त्याच मार्गावर देऊळगाव साखर्शा परिसरातील ट्रॅक्टर क्रमांक एमएच २८ बीडब्ल्यू ९२१६ मधून एक ब्रास रेतीची अवैध वाहतूक सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार सापळा रचून संबंधित ट्रॅक्टर पकडण्यात आला. दोन्ही वाहनांमधून अवैधरित्या वाहतूक करण्यात येणारी रेती तसेच वाहने असा एकूण १६ लाख १६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**या प्रकरणी तीन आरोपींविरुद्ध गुन्हे**

दाखल करण्यात आले असून, पुढील तपास हिवरखेड पोलिस करीत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. श्रेणिक लोढा व उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप पाटील मार्गदर्शनाखाली करण्यात हिवरखेड येथे करण्यात आली. पोलीस स्टेशनचे ठाणेदार संदीप पाटील पोलीस यांच्यासह अंमलदार श्रीकांत चाराटे, राम बस्सी, निखिल शेळके व रामेश्वर राठोड यांनी ही कारवाई यशस्वी केली.

# एकल महिला धोरणासाठी ३० जूनला जिल्हास्तरीय बैठक; सूचना व अभिप्राय मागविले

प्रतिनिधी २४ जून

**बुलढाणा :** राज्यातील विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता, अविवाहित तसेच इतर एकल महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी महाराष्ट्र शासन स्वतंत्र आणि व्यापक 'एकल महिला धोरण' तयार करत आहे. या धोरणाला अधिक परिणामकारक व लोकाभिमुख स्वरूप देण्यासाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, बुलढाणा यांच्या वतीने ३० जून रोजी सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज सभागृह, जिल्हा परिषद, बुलढाणा येथे जिल्हास्तरीय बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या बैठकीत एकल महिलांच्या समस्या, अडचणी आणि त्यावरील उपाययोजनांबाबत सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील एकल महिला, नागरिक, स्वयंसेवी संस्था, महिला संघटना, सामाजिक कार्यकर्ते, अभ्यासक आणि विषयतज्ज्ञांनी या धोरण निर्मिती प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी अमोल डिघुळे यांनी केले आहे. धोरणाचा मसुदा तयार करताना केवळ समस्या मांडण्याऐवजी त्यावरील ठोस उपाय, नवीन योजना, विद्यमान योजनांमधील आवश्यक बदलतसेच कायदे किंवा नियमांमधील सुधारणा याबाबत अभ्यासपूर्ण प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# खामगावात पावसाचे आगमन ; खरिपाच्या आशा पल्लवित !

प्रतिनिधी २४ जून

**खामगाव:** गेल्या काही दिवसांपासून पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या खामगावकरांना सोमवारी झालेल्या पावसाने दिलासा दिला. खामगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पर्जन्यमान केंद्रात २३ जून २०२६ या कालावधीत एकूण १७.२ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे.

**यंदाच्या खरीप हंगामातील हा पहिला**

लक्षणीय पाऊस ठरल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. सोमवारी दुपारनंतर अचानक वातावरणात बदल होऊन आकाश ढगाळ झाले. त्यानंतर सायंकाळच्या सुमारास पावसाने हजेरी लावत उकाड्याने त्रस्त झालेल्या नागरिकांना दिलासा दिला. या पावसामुळे उष्णता आणि दमट वातावरणाचा प्रभाव काही प्रमाणात कमी झाला असून, शहरासह ग्रामीण भागातही आनंदाचे वातावरण आहे. शेतकऱ्यांच्या दृष्टीने हा पाऊस महत्त्वाचा मानला जात असून, खरीप हंगामाच्या तयारीला आता वेग येण्याची शक्यता आहे. सध्या शेतकरी पेरणीपूर्व मशागतीची कामे पूर्ण करण्यात व्यस्त आहेत. पुढील काही दिवसांत समाधानकारक पाऊस झाल्यास सोयाबीन, तूर, मूग, उडीद आणि कपाशीच्या पेरण्यांना वेग येईल, असा अंदाज कृषी क्षेत्रातील जाणकारांनी त्यक्त केला आहे.शेतकऱ्यांच्या अपेक्षा वाढल्या !

पहिल्या लक्षणीय पावसानंतर शेतकऱ्यांमध्ये नवचैतन्य संचारले आहे. या पावसामुळे जमिनीतील आर्द्रता वाढण्यास मदत होणार असून, पेरणीपूर्व मशागत आणि अन्य शेतीकामांना गती मिळण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे खरीप हंगामाबाबत शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत; मात्र हंगाम सुरळीत पार पडण्यासाठी येत्या काही दिवसांत नियमित आणि समाधानकारक पाऊस होणे आवश्यक असल्याचे कृषी तज्ज्ञांचे मत आहे. त्यामुळे आता शेतकऱ्यांसह सर्वांचेच लक्ष आगामी पावसाच्या स्थितीकडे लागले आहे.

**बाजारपेठेत गर्दी कमी!**

खामगाव परिसरात पावसाने हजेरी लावून उष्णतेपासून काहीसा दिलासा दिला असला, तरी बाजारपेठेत अपेक्षित उत्साह आणि गर्दी दिसून आली नाही. अनेक व्यापारी संकुलांमध्ये ग्राहकांची वर्दळ तुलनेने कमी असल्याचे चित्र सोमवारी पाहायला मिळाले. पावसाचा व्यापारी व्यवहारांवर तत्काळ सकारात्मक परिणाम झालेला नसल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे. मात्र, ग्रामीण भागात शेतकऱ्यांची खरीप हंगामासाठीची तयारी वेगाने सुरू झाली असून, पेरणीपूर्व म कृषी निविष्ठांच्या खरेदीसाठी हालचाली वाढल्या आहेत.

# सोयाबीन बियाण्यांच्या किमतींमध्ये 30 ते 40 टक्के वाढ

प्रतिनिधी २४ जून

**खामगाव :** खामगाव बदलत्या आर्थिक परिस्थितीचा आणि वाढत्या उत्पादन खर्चाचा परिणाम आता थेट शेतीच्या पद्धतीवर दिसून येत आहे. बुलढाणा जिल्ह्यात खरीप हंगामातील प्रमुख पीक असलेल्या सोयाबीनच्या बियाण्यांच्या किमतींमध्ये यंदा ३० ते ४० टक्क्यां पर्यंत वाढ झाल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. परिणामी, महागड्या कंपनीच्या बियाण्यां ऐवजी घरगुती बियाण्यांचा वापर करण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढत असल्याचे चित्र आहे. खरीप हंगामाची तयारी अंतिम टप्प्यात असताना बाजारात उपलब्ध बियाण्यांचे दर गेल्या वर्षाच्या तुलनेत लक्षणीय वाढले आहेत.

**बियाण्यासाठी राखीव !**

जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी मागील हंगामात उत्पादित झालेल्या सोयाबीनपैकी काही प्रमाणात सोयाबीन बियाण्यासाठी राखून ठेवले होते. यावर्षी बाजारातील वाढलेल्या दरांमुळे हेच बियाणे पेरणीसाठी वापरण्याचे नियोजन करण्यात येत आहे. पेरणीपूर्वी उगवण क्षमता तपासूनच बियाण्यांची निवड केली जात असल्याने शेतकरी अधिक सावधपणे निर्णय घेत आहेत.

उत्पादन खर्चात सातत्याने वाढ होत असताना बियाण्यां वरील खर्च कमी करण्यासाठी हा पर्याय फायदेशीर ठरत आहे. कृषी केंद्र चालकांच्या माहितीनुसार, दरवर्षी या काळात कंपनीच्या बियाण्यांच्या खरेदीसाठी शेतकऱ्यांची मोठी गर्दी दिसून येते; मात्र यंदा परिस्थिती वेगळी असून, अपेक्षित प्रमाणात विक्री झालेली नाही.

अनेक शेतकरी घरगुती बियाण्यां वर भर देत असल्याने बाजारातील मागणीत घट झाल्याचे चित्र आहे. खतांचे वाढते दर, मजुरी खर्च, कीडनाशकां वरील वाढता खर्च आणि हवामानातील अनिश्चितता यामुळे शेती करणे अधिक खर्चिक झाले आहे. त्यामुळे उपलब्ध संसाधनांचा प्रभावी वापर करून खर्चात बचत करण्याचा प्रयत्न शेतकरी करीत आहेत.

**बियाण्यांची तपासणी आणि प्रक्रिया करण्याचा कृषी तज्ज्ञांचा सल्ला!**

कृषी क्षेत्रातील जाणकारांच्या मते, योग्य साठवणूक केलेले आणि उगवण क्षमता चांगली असलेले घरगुती बियाणे वापरल्यास उत्पादनावर विशेष परिणाम होत नाही. मात्र, बियाण्यांची तपासणी आणि प्रक्रिया करणे आवश्यक असल्याचा सल्ला कृषी तज्ज्ञांनी दिला आहे.

**जिल्ह्यातीत कृषी अर्थव्यवस्थेत सोयाबीन पिकाला महत्त्वपूर्ण स्थान !**

बुलढाणा जिल्हा हा राज्यातील प्रमुख सोयाबीन उत्पादक जिल्ह्यांपैकी एक मानला जातो. खरीप हंगामात मोठ्या क्षेत्रावर सोयाबीनची लागवड केली जाते. कमी कालावधीत उत्पादन देणारे पीक, बाजारातील उपलब्धता आणि प्रक्रिया उद्योगांमधील मागणी यामुळे शेतकरी मोठ्या प्रमाणावर सोयाबीनला पसंती देतात.

जिल्ह्यातील कृषी अर्थव्यवस्थेत या पिकाचे महत्त्वपूर्ण स्थान असून हजारो शेतकऱ्यांचे आर्थिक नियोजन या पिकावर अवलंबून असते.

# विद्यार्थ्यांनो यशवंत व्हा, गुणवंत व्हा आणि राष्ट्रनिर्मितीमध्ये आपले योगदान द्या...माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा

प्रतिनिधी २४ जून

♦ राणा फाऊंडेशन व सानंदा मित्र मंडळाच्या वतीने १० वी व १२ मधील प्राविण्यप्राप्त विद्यार्थ्यांचा पालकांसह हदस्पर्शी सत्कार



**खामगाव :-** हिंदुसुर्य महाराणा प्रतापसिंह यांनी प्रतिकुल परिस्थितीतही स्वाभिमान, धैर्य आणि जिदद् यांची कास सोडली नाही. संकटांचा सामना करीत त्यांनी स्वराज्य आणि स्वाभिमानासाठी अखंड संघर्ष केला.विद्यार्थ्यांनी त्यांच्या जीवनातुन प्रेरणा घेवुन स्पर्धेच्या युगामध्ये जिदद्?? आणि परिश्रमाने चांगले शिक्षण आत्मसात करावे,मेहनतीच्या बळावर यशवंत होवुन,किर्तीवंत होवुन राष्ट्रनिर्मितीमध्ये आपले योगदान देवुन आपल्या परिवाराचा नाव लौकीक उंचवावा असे आवाहन माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी केले.दि.१७ जून २०२६ रोजी हिंदुसुर्य महाराणा प्रतापसिंहजी यांच्या जयंतीनिमित्त नांदुरा रोडवरील स्व.राजीव गांधी उद्यान येथे राणा फाऊंडेशन व सानंदा मित्र मंडळाच्या वतीने १० व १२ वी मधील प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा त्यांच्या आई-वडीलांचा हदस्पर्शी सत्कार करण्यात आला त्याप्रसंगी ते बोलत होते.

या कार्यक्रमाला माजी नगराध्यक्ष राणा अशोकसिंह सानंदा, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ज्येष्ठनेते पंजाबरावदादा देशमुख, राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या शहर अध्यक्षा श्रीमती सरस्वतीताई खासने,शहर उपाध्यक्ष नरहरी टीकार, खामगाव तालुका अध्यक्ष मनोज वानखडे, बाजार समितीचे संचालक विलाससिंग इंगळे, राणा लकी सानंदा एज्यु.शॉवरचे मुख्याध्यापक संजय शर्मा, विराट मल्टीपर्पज संघटनेचे अध्यक्ष मनोज नगरनाईक,डॉ.आर.के.राजपुत,दुर्गासिंग राजपुत आदींची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलतांना माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा म्हणाले की,१० वी १२ वी हा विद्यार्थ्यांच्या शालेय जीवनातील भावी वाटचालीची दिशा ठरविणारा महत्वाचा टप्पा आहे.हा प्रवासाचा शेवट नसुन नव्या वाटचालीची सुरुवात आहे. यश मिळाले म्हणुन थांबु नका आणि अपयश आले तर खचु नका, सातत्य, परिश्रम आणि सकारात्मक विचार यांच्या बळावर शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःचे उज्वल भविष्य घडवावे. सानंदा मित्र मंडळ व राणा फाऊंडेशनच्या वतीने मागील अनेक वर्षापासुन गुणवंत विद्यार्थ्यांचा त्यांच्या पाल्यासह सत्कार करुन त्यांचे मनोबल वाढविण्यासाठी प्रयत्न केल्या जात आहे.विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच आपल्या शरीराची सुध्दा काळजी घ्यावी.आपले शरीर सुदृढ,निरोगी ठेवुन आई-वडीलांची प्रामाणिकपणे सेवा करावी असेही त्यांनी सांगितले.

यावेळी इयत्ता १० वी १२ वी मध्ये प्राविण्यप्राप्त करणारे विद्यार्थी सुमु रमेशसिंह चव्हाण,परी निरंजनसिंह राजपुत, माही ठाकुर, गजराजसिंह राजपुत,विर पवार,विवेक योगेश इंगळे, तन्वी संजय बोदडे,सुरज बहादुरसिंग पवार,कुणाल गणेश चव्हाण,रणवीरसिंह मोतीसिंग पाटील, प्रथमेश संजय दहीभात,पृथ्वीराज गिरधरसिंग चव्हाण,शिवम गणेशपवार, आराध्या निलेशसिंह राजपुत,कु.विश्वजा अमोल काळे,कु.श्रेया पवन अग्रवाल, कु.प्रिया जगदिश अग्रवाल,कु.कोमल एकनाथ मानकर, कु.सानिका सुशिल अवचार,कु.खुशी धिरजसिंह पवार,कु.श्रावणी श्रीराम खासणे, मोहित शेखर शर्मा, जानव्ही ईश्वर मोरे,समर्थसिंह ईश्वरसिंह तोमर,वेदिका सुरेंद्र चव्हाण,प्रज्वल पवार यांच्यासह आदी विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा फेटा बांधुन मान्यवरांचे हस्ते भगवा दुपटट्ा घालुन व गुलाब पुष्प देवुन सत्कार हदयस्पर्शी सत्कार करण्यात आला व लाडु भरवुन त्यांचे तोंड गोड करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्र संचालन डॉ.आर.के.राजपुत यांनी तर आभार प्रदर्शन पंजाबरावदादा देशमुख यांनी मानले.कार्यक्रमाला महेंद्रसिंग राठोड,कल्याणसिंग तोमर,ईश्वरसिंग राणा,चेतन राणा यांच्यासह १० वी व १२ वी मधील प्राविण्य प्राप्त विद्यार्थी, विद्यार्थांनी व पालकवर्ग मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कल्याणसिंग वतपाळ,शुभम मोरे,सौ.पुजा शिंगणे,पायल ठाकुर,कु.वाभडे मॅडम,सौ.मोनिका काटकर, सत्यनारायण शर्मा,अमर पिंपळेकर,संतोष आटोळे,मदन गावंडे,प्रताप कदम, सुरेंद्र चव्हाण यांच्यासह राणा फाऊंडेशन व सानंदा मित्र मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.













हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK